मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ ■ अंक : २९९ ■ रविवार, १२ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# ज्येष्ठ नागरिकांच्या तीर्थदर्शन यात्रेच्या इच्छापूर्तीचा मनस्वी आनंद – मुख्यमंत्री

**नागपूर :** भगवान गौतम बुद्धाच्या विचाराचे प्रेरणास्त्रोत म्हणून आपण बोधगया येथे जातो. एकदा तरी तेथे जाऊन दर्शन घेण्याची ओढ भाविकांमध्ये असते. ज्येष्ठ नागरिकांच्या दर्शनाची इच्छा पूर्ण व्हावी, या दृष्टीने आपण मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु केली. नागपूर येथून या योजनेअंतर्गत यावर्षी सुमारे 800 भाविकांना जाता येत आहे, याचा मनस्वी आनंद असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर रेल्वे स्थानक येथून बोधगयेकडे जाणाऱ्या भाविकांच्या पहिल्या चमूला शुभेच्छा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विशेष समारंभात ते बोलत होते. यावेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, संजय मेश्राम, समीर मेघे, चरणसिंह ठाकूर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव



हर्षदीप कांबळे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुळकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे व वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अनेक ज्येष्ठ नागरिकांना आपल्या श्रद्धेच्या तीर्थस्थळी जाऊन दर्शन घेण्याची तीव्र इच्छा असते. आर्थिक, शारीरिक आणि कौटुंबिक

## नागपूर येथून मुख्यमंत्री तीर्थदर्शन यात्रेचा शुभारंभ

अडचणींमुळे त्यांची ही इच्छा पूर्ण होणे अशक्यप्राय होऊन जाते. अशा गरजू ज्येष्ठ नागरिकांना आपल्या तीर्थस्थळाच्या दर्शनाची इच्छा पूर्ण होता यावी, या दृष्टीने आम्ही ही योजना आकारास आणली. आज या योजनेअंतर्गत असंख्य भाविकांना त्याचा लाभ होत आहे. सामाजिक न्याय विभागाने अतिशय उत्तमरित्या ही योजना राबविल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गौरवोद्गार काढले भाविकांच्या इच्छापूर्तीचा आनंद ही योजना यशस्वी झाल्याची पावती आहे. या यात्रेत कोणत्याही वृद्ध भाविकांची गैरसोय होऊ नये, या दृष्टीने सामाजिक न्याय विभागाने काळजी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आपण लवकरच बोधगया येथे महाराष्ट्रातील भाविकांसाठी मोठे संकुल निर्माण करीत असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी देऊन भाविकांना शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व मान्यवरांच्या हस्ते बोधगया येथे भाविकांना घेऊन जाणाऱ्या विशेष रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

# सीकेटी महाविद्यालयात ‘जागतिक लोकसंख्या दिन’ उत्साहात साजरा; लोकसंख्या व शाश्वत विकासाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नवीन पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आज ( ११ जुलै) ‘जागतिक लोकसंख्या दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. लोकसंख्या वाढीबाबत जनजागृती करणे, तिचे सामाजिक व आर्थिक परिणाम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि जबाबदार नागरिकत्वाची जाणीव निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बी. एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत



करून कार्यक्रमाच्या उद्देशाविषयी माहिती दिली. त्यांनी लोकसंख्या आणि विकास यांचा परस्परसंबंध स्पष्ट करत या विषयाचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्ते तथा व्यावसायिक अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ए. के. दीक्षित यांनी ‘जागतिक लोकसंख्या दिन’ या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी भारतातील वाढती लोकसंख्या, तिची प्रमुख कारणे, आर्थिक व सामाजिक परिणाम, नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण, रोजगार, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वत विकासावर होणारे परिणाम यांची माहिती दिली. तसेच लोकसंख्या नियंत्रणासाठी जनजागृती, शिक्षण, महिलांचे सक्षमीकरण, कुटुंब नियोजन आणि शाश्वत विकासाच्या धोरणांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

या कार्यक्रमात अर्थशास्त्र विभागातील ७९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विषयासंदर्भात विविध प्रश्न विचारून चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकसंख्याविषयक समस्यांबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. तसेच जबाबदार नागरिक म्हणून समाजाप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव अधिक दृढ झाली. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आय.क्यू.ए.सी.) समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बी. एस. पाटील, प्रा. एच. एस. खरात आणि डॉ. के. बी. ढोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# माहुर तहसिल कार्यालयावर किसान सभेच्या वतीने निर्देशने



**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहुर गड नांदेड प्रतिनिधी: सय्यद इसा :** दि.१० जुलै रोजी माहुर तहसिल कार्यालयावर अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने निर्देशने करण्यात आले.आज शेवटचं विधानभवनात अधिवेशन असल्यामुळे शेतकरी सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे असे तहसिलदार यांना कॉम्रेड शंकर सिडाम व कॉम्रेड किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

यावेळी तालुका कमिटी सदस्य कॉ अमोल आडे कॉ राजुभाऊ पिसरवाड,कादर खान , कॉम्रेड शंकर गंधमवार, रमेश मेश्राम,तुळसींग चव्हाण,बलदेव राठोड, अरविंद पवार,गोपालन पवार,दत्ता कांबळे,व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.




# कोकणवासीयांसाठी आनंदाची बातमी ! ठाणे रेल्वे स्थानकात अतिरिक्त आरक्षण खिडकीचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी :** गौरी-गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन ठाणे रेल्वे स्थानक येथे अतिरिक्त आरक्षण खिडकी (Extra Reservation Window) सुरू करण्यात आली. या अतिरिक्त आरक्षण खिडकीचे उद्घाटन ठाण्याचे खासदार, कार्यसम्राट, संसदरत्न मा. श्री. नरेशजी म्हस्के यांच्या शुभहस्ते शनिवारी (दि. ११ जुलै) संपन्न झाले.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी कोकणवासीयांना आरक्षण प्रक्रिया अधिक सुलभ व जलद व्हावी, तसेच प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी ही सुविधा सुरू करण्यात आल्याचे सांगितले. गणेशोत्सव काळात मोठ्या प्रमाणावर होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने केलेल्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले.

खासदार मा. श्री. नरेशजी म्हस्के यांनी रेल्वे प्रशासनाचे आभार मानत, प्रवाशांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू राहतील, असे आश्वासन दिले.

या उद्घाटनप्रसंगी रेल्वे प्रशासनाचे अधिकारी, कर्मचारी तसेच विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कोकणात जाणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी ही अतिरिक्त आरक्षण खिडकी मोठा दिलासा ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# यंदाच्या पांडुरंगाच्या महापुजेचा मान जनतेसाठी काम करणाऱ्या श्री आयुक्त तुकाराम मुंढे साहेबांना मिळावी – ह भ प महेश महाराज पोंगडे



**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे :** सर्व संतानी अभंगाच्या माध्यमातून धर्मातील भेसळ दूर केली. कर्मकांड,जातीयवाद दूर करून एकेश्वर वाद मांडून पांडुरंगाच्या नामाचा प्रचार आणि प्रसार केला.त्यांना या कामी खूप संघर्ष करावा लागला.असाच काहीसा संघर्ष करत करत तुकाराम मुंढे साहेब अन्न औषध प्रशासन मधे आयुक्त पदी निवड झाल्यापासून




अन्न भेसळीच्या विरोधात दंड थोपटले आहे.राज्यभरातील सर्व जनता त्यांना खरा हिरो समजते आहे. शोधल मीडियावर त्यांच्यावर स्तुती सुमने उधळली जात असताना त्यांचा योग्य सन्मान म्हणून यंदाच्या आषाढी एकादशी वारीच्या निमित्ताने पंढरपूरच्या पाडुंगाच्या महापूजेचा मान आदरणीय,पूजनीय अशा आयुक्त श्री तुकाराम मुंढे साहेब यांना मिळावा अशी महाराष्ट्रचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या कडे सत्य शोधक वारकरी महासंघ यांची मागणी करीत आहे ह भ प महेश महाराज पोंगडे. अध्यक्ष:- सत्यशोधक वारकरी महासंघ , कोकण विभाग यामुळे समाजाचे हित जपले जाते असे प्रशासकीय अधिकारी यांना भरीव काम करण्याची ऊर्जा प्राप्त होईल आणि महाराष्ट्रतून भ्रष्टाचार हद्दपार होईल पांडुरंग त्यांच्या हाकेला धावेल हीच अपेक्षा

# दिवंगत अर्जुन पाटील यांना भजन-कीर्तनद्वारे आदरांजली!

## महेंद्रशेठ घरत यांनी केले पत्रकार कृष्णा पाटील यांच्या परिवाराचे सांत्वन



**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी** : उलवे नोडमधील मोरावे गावचे ज्येष्ठ नागरिक अर्जुन भोकाजी पाटील (वय- ७८) यांचे गुरुवारी (ता.९) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील यांचे ते वडील होत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत आणि सौ. शुभांगीताई घरत यांनी शनिवारी (ता. ११) कृष्णा पाटील यांच्या परिवाराचे सांत्वन केले. यावेळी एम.जी. ग्रुपचे सहकारी उपस्थित होते. दिवंगत अर्जुन पाटील यांनी वारकरी सांप्रदायांशी आपली नाळ जोडलेली होती. ते भजन-कीर्तनात रममान होत असल्याने त्यांना भजन-कीर्तनद्वारेच आदरांजली वाहण्यात येणार आहे. त्यामुळे दररोज सकाळी १० ते १२ 'गरुड पुराणा'चे वाचन दत्ता म्हात्रे करतील, तर सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत दररोज भजन सेवा असेल. त्यामुळे रविवारी (ता. १२) दत्त प्रासादिक भजन मंडळ, गव्हाण. बुवा- देवानंद कोळी, मृदंगमणी- प्रशांत कोळी. सोमवारी (ता. १३) श्रीपतबाबा भजन मंडळ, गव्हाण. बुवा- ज्ञानेश्वर म्हात्रे, मृदंगमणी- गौरव म्हात्रे. मंगळवारी (ता. १४) जय भवानी प्रासादिक मंडळ, धाकटी जुई. बुवा- मोहन पाटील, वेश्वी. मृदंगमणी- यश रसाळ (दिघोडे). बुधवारी (ता. १५) श्रीकृष्ण प्रासादिक महिला भजन मंडळ, बेलपाडा. गायिका- वर्षा ठाकूर, गीता ठाकूर. मृदंगमणी- अलंकार कडू. गुरुवारी (ता. १६) साईराम प्रासादिक भजन मंडळ, मोहा. बुवा- राहुल कोळी, मृदंगमणी- जगन्नाथ कोळी. शुक्रवारी (ता. १७) कुलदैवत प्रासादिक भजन मंडळ, उलवे, तरघर. बुवा- सिद्धेश पाटील, विनायक खारकर. मृदंगमणी- किरण ओवळेकर, तबलावादक- सागर मढवी. शनिवारी (ता. १८) नादब्रम्ह साधना भजन मंडळ, खारघर (रांजणपाडा), बुवा- पंडित निवृत्तीबुवा चौधरी, मृदंगमणी- निलेश पाटील (कोपरा). रविवारी (ता. १९) श्री एकादशी भजन मंडळ, मोरावे. बुवा- महादेव पाटील, अंकुश पाटील, दत्ता म्हात्रे. मृदंगमणी- सागर मढवी. सोमवारी (ता. २०) गावदेवी प्रासादिक भजन मंडळ, न्हावे. बुवा- महेश पाटील, मृदंगमणी- महादेव ठाकूर हे भजन करतील. मंगळवारी (ता. २१ जुलै) उत्तरकार्य आहे. त्यानिमित्त ह.भ.प. महेश महाराज साळुंखे (पाटणोली) यांचे कीर्तन होणार आहे. यावेळी पखवाज- आदित्य पाटील, गायक- अल्पेश पाटील, विनायक पाटील आणि सहकाऱ्यांची त्यांना साथ लाभणार आहे. हे सर्व कार्यक्रम अर्जुन भवन, मोरावे येथे होणार आहेत.

# आ. विक्रांत बाळासाहेब पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात संपन्न

## सभागृहात सर्वसामान्यांचे प्रश्न आ.विक्रांत पाटील सातत्याने मांडत असल्याने त्यांचे राजकीय भवितव्य उज्वल : महसूलमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : सभागृहात सर्वसामान्यांचे प्रश्न आ.विक्रांत पाटील सातत्याने मांडत असल्याने त्यांचे राजकीय भवितव्य उज्वल असल्याचे व पुढील काळामध्ये त्यांच्या छातीवर हिरवा मानाचा बिल्ला तुम्हाला दिसेल हा माझा शब्द आहे असे गौरवोद्गार पनवेल शहरातील रॉयल गार्डन बँक्वेट हॉल येथे आ. विक्रांत बाळासाहेब पाटील यांचा अभिष्टचिंतन सोहळा महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काढले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार योगेश टिळेकर, आमदार धैर्यशील कदम, जिल्हाधिकारी किशन जावळे, प्रांत पवन चांडक, तहसीलदार मिनल भामरे-भोसले, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, जे.एम.म्हात्रे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सिद्धार्थ बांठीया, शिवसेना जिल्हाप्रमुख व नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेवक राजू सोनी, राजू शर्मा, आरिफ पटेल, तानाजी खंडागळे, प्रदीप देशमुख यांच्यासह मुंबई, नवी मुंबई व पनवेलमधील महानगरपालिकेचे नगरसेवक व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



यावेळी प्रस्तावनेत बोलताना आ. विक्रांत पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करत असताना पनवेलमधील नागरिक, मातृशक्ती, युवाशक्ती आणि राज्यभरातील सहकाऱ्यांनी दिलेले प्रेम, विश्वास व पाठबळ हीच लोकहितासाठी कार्य करण्याची प्रेरणा असल्याचे सांगितले. जनतेचा स्नेह आणि विश्वास यामुळे समाजाच्या विकासासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अभिष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नागरिकांना विविध लोकोपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले. यामध्ये सायकली, शिलाई मशीन, फूड प्रोसेसर, आटा चक्की, भात पेरणी यंत्र, छत्र्या, स्पीकर्स, महिलांसाठी साड्या, ग्लुकोमीटर, रेनकोट, सीएनजी कूपन तसेच आयुष्यमान भारत कार्ड यांचा समावेश होता. शासनाच्या विविध योजनांचा लाभ आणि आवश्यक मदत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी विक्रांत पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत समाजातील सर्व स्तरातील लोकांना न्याय देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न नेहमीच दिसून आला आहे. सभागृहात येवून त्यांना वर्ष झाले आहे तरी त्यांनी जे-जे विषय मांडले आहेत ते सर्वसामान्यांच्या हिताचे होते व त्यांनी न्याय मिळवून दिला आहे. त्यामुळेच रायगड जिल्ह्याचे कलेक्टर, प्रांत व तहसीलदार यांना मी आदेश दिले आहेत की विक्रांत पाटील जे प्रश्न त्यांच्यासमोर मांडतील त्या प्रश्नांना न्याय मिळवून द्यावा व त्यांना योग्य सहकार्य करावे. सिडको, नैना या महत्वाच्या प्रश्नांकडे सुद्धा विक्रांत पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा करून तो सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच आज एवढ्या मोठ्या सभागृहात भरगच्च गर्दी दिसून येत आहे हीच त्यांच्या कामाची पोचपावती आहे, असेही त्यांनी गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवर, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक आणि पनवेलकर नागरिकांचे आ. विक्रांत पाटील यांनी आभार मानले. तसेच पनवेलच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या हितासाठी भविष्यातही पूर्ण निष्ठेने व समर्पित भावनेने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# विशाल मनोहर सावंत मित्र परिवाराच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : विशाल मनोहर सावंत मित्र परिवार यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत बोंडारपाडा जिल्हा परिषद शाळा आणि दुंदरे आदिवासी वाडी येथील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. गरीब व गरजू मुले केवळ आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत, याच उदात्त उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.



याप्रसंगी बोलताना 'एस.पी. इन्फ्रा'चे शैलेश गायकवाड यांनी मित्र परिवाराच्या या उपक्रमाचे कौतुक केले. ते म्हणाले की, "शिक्षण हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे आणि ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची साधने पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. आजच्या काळात दर्जेदार शिक्षण ही काळाची गरज आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या वह्यांचा योग्य वापर करून जिद्दीने अभ्यास करावा व आपले भविष्य उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी आमचा मित्र परिवार नेहमीच प्रयत्नशील राहील. यानंतर दुंदरेचे माजी ग्रामपंचायत सदस्य दीपक उलवेकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विशाल मनोहर सावंत मित्र परिवाराच्या माध्यमातून नेहमीच असे विविध लोकोपयोगी कार्यक्रम राबवले जातात. केवळ वह्या वाटपच नव्हे, तर लॉकडाऊनच्या कठीण काळातही या परिवाराने संयुक्तरीत्या अनेक ठिकाणी गरजूंना धान्य वाटप केले होते. तसेच महाड येथील पूरग्रस्त भागात प्रत्यक्ष जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले होते. संकटसमयी किंवा कोणत्याही आपत्तीमध्ये सापडलेल्या नागरिकांना तात्काळ मदत देण्यासाठी हा मित्र परिवार नेहमीच अग्रेसर राहिला आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी विशाल मनोहर सावंत, एस.पी. इन्फ्रा ग्रुपचे शैलेश गायकवाड, श्रिया फाउंडेशनचे संदीप म्हात्रे, गोविंद शेळके, दुंदरेचे माजी ग्रामपंचायत सदस्य दीपक उलवेकर, नरेश मढवी, देविदास चौधरी, धिरज कदम, सागर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत महाबोधी गया मंदिर, बोधगया बिहार येथे ट्रेन ने मोफत लाभ घेणेबाबत श्री. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई/मुंबई-** ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत दिनांक 19 व 20 जुलै 2026 रोजी महाबोधी गया मंदिर, बोधगया, बिहार येथे ट्रेन जाणार आहे. सदर योजनेचा लाभ घेणेबाबत मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, सिंधुदूर्ग, रत्नागिरी या या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील 60 वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत एका यात्रेकरीता पात्र व्यक्तीला योजनेचा एक वेळ लाभ मिळणार आहे. सदर योजनेअंतर्गत प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इत्यादी बाबीं मोफत असेल.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी यांचे वार्षिक उत्पन्न 2 लाख 50 हजार असावे. रहिवासी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व वय वर्षे 60 किंवा त्या वरील ज्येष्ठ नागरीक असावा.

मुंबई विभागात सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कार्यालयामार्फत सदर योजना राबविण्यात येत आहे.

तरी मुंबई विभागातील ज्या ज्येष्ठ नागरिकांना बौद्ध गया मंदिर बिहार येथे ट्रेन ने जावयाचे आहे . त्यांनी अर्ज नोंदणीसाठी मुंबई विभागातील सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर उपनगर ठाणे पालघर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग या कार्यालयाशी संपर्क साधावा व सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन श्री बाळासाहेब सोळंकी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग यांनी केले आहे.

# बदलते वय आणि किशोरवयीन मुलींचे आरोग्य: काळजी अन् हितगूज

वय वर्षे १० ते १९ हा काळ म्हणजे बालपणाकडून तारुण्याकडे नेणारा एक सुंदर पूल आहे. या वयाला आपण 'किशोरवय' म्हणतो. या काळात मुलींच्या शरीरात आणि मनात वेगाने बदल होत असतात. संप्रेरकांमधील (हार्मोनल) बदलांमुळे एकाच वेळी शारीरिक वाढ आणि भावनिक वादळे अनुभवायला मिळतात. अशा वेळी स्वतःचे आरोग्य जपण्यासाठी आणि पालकांनी त्यांना योग्य दिशा दाखवण्यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.



**आहाराकडे विशेष लक्ष; (पौष्टिक पोषण)**

वाढत्या वयामुळे शरीराला सकस अन्नाची नितांत गरज असते. मासिक पाळी सुरू झाल्यामुळे या वयात शरीरातील रक्त कमी होण्याची (ॲनिमिया) भीती असते. यासाठी आहारात हिरव्या पालेभाज्या, गूळ, हरभरे, डाळिंब, बीट आणि खजूर यांचा समावेश आवर्जून करावा. शरीराची उंची आणि हाडांची वाढ योग्य होण्यासाठी रोज दूध, दही, पनीर, अंडी किंवा कडधान्ये खावीत. पिझ्झा, बर्गर, वेफर्स आणि कोल्ड्रिंक्सचे अतिसेवन वजन वाढवण्यासाठी पाळीच्या विकारांना कारणीभूत ठरते.

**मासिक पाळी आणि वैयक्तिक स्वच्छता**

मासिक पाळी ही निसर्गाची एक सुंदर आणि सामान्य प्रक्रिया आहे. त्याबद्दल मनात कोणतीही भीती, लाज किंवा संकोच बाळगू नये. संसर्ग टाळण्यासाठी दर ४ ते ६ तासांनी सॅनिटरी पॅड बदलणे आवश्यक आहे. मासिक पाळीच्या काळात दररोज स्वच्छ अंघोळ करावी आणि गुप्तभागांची स्वच्छता राखावी. आपली पाळी नियमित आहे की नाही हे समजण्यासाठी दर महिन्याला पाळीच्या तारखांची नोंद डायरी किंवा मोबाईल ॲप मध्ये करून ठेवावी.

या वयात चिडचिड होणे मुड अचानक बदलणे किंवा ताण येणे अतिशय स्वाभाविक आहे मनातील कोणती भीती शंका किंवा शाळा कॉलेजातील समस्या आपल्या आईशी वडिलांशी किंवा जवळच्या मैत्रिणीची उघडपणे बोलावे. मनमोकळे केल्याने ताण कमी होतो. स्क्रीनवर दिसणारे आभासी जग पाहून स्वतःच्या शरीराची रंगाची किंवा कपड्यांची इतरांशी तुलना करू नये .प्रत्येक मुलगी स्वतःमध्ये वेगळी आणि सुंदर असते. समवयस्कांच्या दबावाखाली येऊन कोणत्याही चुकीच्या गोष्टीला बळी पडू नका. चुकीच्या गोष्टीला स्पष्ट शब्दात नकार देण्याचा आत्मविश्वास बाळगा.

दिवसभर एकाच जागी बसून राहण्याऐवजी शरीराला व्यायामाची सवय दिवसातून किमान ४५ मिनिटे धावणे सायकल चालवणे दानश योगासने किंवा मैदानी खेळ खेळावे त्यामुळे शरीरात हॅप्पी हार्मोन्स तयार होतात आणि मन प्रसन्न राहते रात्री उशिरापर्यंत मोबाईल पाहत बसणे आरोग्यासाठी घातक आहे वाढत्या वयात शरीराची झीज भरून निघण्यासाठी रात्री किमान ८ ते ९ तासांची शांत झोप आवश्यक आहे.

आजच्या डिजिटल युगात मुलींनी स्वतःच्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहणे गरजेचे आहे. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींशी मैत्री करू नका. आपले वैयक्तिक फोटो पत्ता किंवा फोन नंबर कोणाशी शेअर करू नका. वावरताना जर कोणाचा स्पर्श किंवा वागणूक चुकीची वाटली तर न घाबरता तात्काळ आपल्या पालकांना किंवा शिक्षकांना कल्पना द्या.

किशोरवयीन मुलींना धाकात किंवा बंधनात ठेवण्यापेक्षा त्यांच्याशी मैत्रीचे नाते निर्माण करा त्यांना येणाऱ्या अडचणी समजून घ्या आणि रागावण्या ऐवजी प्रेमाने आणि शास्त्रीय माहिती देऊन त्यांची भीती दूर करा त्यांचा आत्मविश्वास हाच त्यांच्या भविष्यातील आरोग्याचा पाया आहे.

**सौ. चैताली राकेश म्हात्रे**
**रा.जि.प.शाळा नवीन शेवे उरण**
**शिक्षिका.**

## रामेश्वरम येथे भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम राष्ट्रीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन! 'IGNIT India २०२६' !

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : भारताचे माजी राष्ट्रपती आणि मिसाईल मॅन भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या अकराव्या स्मृतीदिनानिमित्त तामिळनाडूतील रामेश्वरम येथे 'IGNIT India २०२६ या भव्य राष्ट्रीय STEM (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 'एपीजे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशन' (AKIF) आणि 'हाऊस ऑफ कलाम, रामेश्वरम' यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता गोस्वामी मठम-२, रामतीर्थ जवळ, रामेश्वरम येथे हा सोहळा पार पडणार आहे.

डॉ. कलाम यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि 'विकसित भारत' या स्वप्नाला अभिवादन करण्यासाठी आयोजित या महोत्सवात देशभरातील शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

**STEM स्पर्धा आणि स्वरूप;**

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण विद्यार्थी केंद्रित STEM स्पर्धा हे असेल यामध्ये विद्यार्थी आपले विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प नवकल्प आणि कार्यरत मॉडेल्स सादर करू शकणार आहेत प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाने आपल्या स्तरावर स्पर्धा घेऊन त्यामधील सर्वोत्तम तीन प्रकल्प अंतिम फेरीसाठी रामेश्वरम येथे पाठवावेत असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महोत्सव सहभागी होण्यासाठी शाळांना आपल्या सहभागाची पुष्टी आणि शिक्षक समन्वयकाची माहिती २४ जुलै २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे मुख्य कार्यक्रमाच्या

### महोत्सवात महाराष्ट्रातील शाळा-महाविद्यालयांना सहभागाचे आवाहन ;२४ जुलैपर्यंत नोंदणीची मुदत; उत्कृष्ट प्रकल्पांना राष्ट्रीय पुरस्कार!




दिवशी २७ जुलै सकाळी साडेदहापूर्वी सर्व विज्ञान मॉडेल्स ची निश्चित मांडणी करावी लागेल. सकाळी साडेदहा ते अकरा या वेळेत तज्ञ परीक्षकांकडून प्रकल्पाचे मूल्यांकन केले जाईल. त्यानंतर चहापान, डॉ कलाम यांना पुष्पांजली, स्मृती व्याख्यान, मान्यवरांची भाषणे आणि पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होईल. दुपारच्या भोजना बाबतची माहिती २५जुलै पर्यंत कळवली जाईल.

**विनामूल्य सहभाग आणि सन्मान ;**

या राष्ट्रीय महोत्सवातील सहभाग पूर्णपणे विनामूल्य आहे मात्र प्रवास आणि निवासाचा खर्च संबंधित सहभागी संस्था किंवा विद्यार्थ्यांना स्वतः करायचा आहे. अशी माहिती डॉक्टर कलाम यांचे नातू तथा फाउंडेशनचे फाउंडर ट्रस्ट ए पी जे एम जे शेख सलीम यांनी दिली आहे. अंतिम फेरीतील सर्वोत्तम तीन प्रकल्पांना फाउंडेशन तर्फे विशेष प्रशंसा प्रमाणपत्र व इतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

**महाराष्ट्रातील शाळांना सुवर्णसंधी;**

ए.पी.जे अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाउंडेशनचे राज्य कोर टीम सदस्य आणि आदर्श शासकीय शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ.संदीप दत्तात्रय वारगे यांनी रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील सर्व शाळा व महाविद्यालयाने राष्ट्रीय विज्ञान महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्या महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या नवोपक्रमांना थेट राष्ट्रीय स्तरावर एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

# केक नव्हे.समाजसेवेचा उत्सव विद्यार्थ्यांच्या आनंदात साजरा वाढदिवस!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड** : विविध जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, छत्र्या, पाण्याच्या बाटल्या व खाऊचे वाटप; वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची अनोखी दिशा. वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे, फटाके उडवणे किंवा मित्रपरिवाराला मेजवानी देणे एवढ्यापुरताच मर्यादित न राहता, समाजाप्रती आपली जबाबदारी जपत तो प्रेरणादायी पद्धतीनेही साजरा करता येतो, याचे सुंदर उदाहरण सारडे विकास मंचाचे अध्यक्ष तथा सारडे गावच्या प्रसिद्ध ऑक्सिजन पार्कचे प्रेरणास्थान असलेले निसर्गप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते नागेंद्र म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त पाहायला मिळाले.

रविवार, दि. १२ जुलै रोजी असलेल्या त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवारी, दि. ११ जुलै २०२६ रोजी त्यांच्या जिवलग मित्रांनी, हितचिंतकांनी, शिक्षकांनी, अधिकारी वर्गाने व महिला





भगिनींनी रायगड जिल्ह्यातील विविध जिल्हा परिषद शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये सामाजिक उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, छत्र्या, ओळखपत्रे (आयकार्ड), पाण्याच्या बाटल्या आणि खाऊचे वाटप करून वाढदिवसाला सामाजिक जाणिवेची अनोखी दिशा देण्यात आली.

या उपक्रमांतर्गत रा. जि. प. शाळा, पाले येथे हरिश्चंद्र म्हात्रे-पाले यांनी विद्यार्थ्यांना छत्र्या व खाऊचे वाटप केले. त्याच शाळेत आदर्श शिक्षक उपेंद्र ठाकूर -खोपटे यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. सारडे अंगणवाडीत सुयश क्लासेसचे अध्यक्ष निवास गावंड यांनी विद्यार्थ्यांना पाण्याच्या







बाटल्या भेट दिल्या.रा. जि. प. शाळा, आवरे येथे तळोजा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी विजय पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. राधाकृष्ण महिला ग्रुप, सारडे यांच्या महिला भगिनींनीही विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सामाजिक सहभाग नोंदवला.

रा. जि. प. शाळा, सारडे येथेल हॉटेल MDS चे मालक नितीन म्हात्रे व आतिश म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. रा. जि. प. शाळा व अंगणवाडी, कडापे येथे प्रशांत म्हात्रे (कडापे) यांनी लहान मुलांना खाऊचे वितरण केले. तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, कोपरगाव येथे 'युवक आधार'च्या पत्रकार ॲडव्होकेट रणिता ठाकूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी रा. जि. प. शाळा पालेचे शिक्षक प्रशांत कोळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन म्हात्रे, उरणचे सुप्रसिद्ध निवेदक सुनील वर्तक, सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठानचे संतोष जोशी, जितेंद्र म्हात्रे, UFPO चे संचालक प्रकाश माळी, अमोल पाटील, ॲडव्होकेट रणिता ठाकूर, हितेश म्हात्रे, सारडे अंगणवाडीच्या सेविका संजीवनी म्हात्रे तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.याशिवाय श्री राधाकृष्ण महिला ग्रुपच्या सुलक्षणा पाटील, भगवती पाटील, कविता गावंड आणि कल्पना पाटील यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.हा संपूर्ण उपक्रम यशस्वी करण्यासाठी हरिश्चंद्र म्हात्रे, उपेंद्र ठाकूर, नितीन म्हात्रे आणि प्रकाश माळी यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी नागेंद्र म्हात्रे यांनी सर्व मित्रपरिवार, अधिकारी वर्ग, शिक्षक, महिला भगिनी व सहकाऱ्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करताना सांगितले की, "वाढदिवस हा केवळ वैयक्तिक आनंदाचा दिवस नसून समाजाला काहीतरी परत देण्याची संधी आहे. आजच्या विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सेवाभाव आणि माणुसकीची बीजे रुजावीत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच माझ्यासाठी सर्वात मोठी वाढदिवसाची भेट आहे."समाजाला सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांनी कौतुकास्पद ठरवत, अशा सामाजिक पद्धतीने वाढदिवस साजरे करण्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी, अशी भावना व्यक्त केली.

# पनवेलमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिना निमित्त " विवेक जागर करंडक पथनाट्य स्पर्धा "

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख एम.डी.भोईर पनवेल:** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त विवेक जागर संस्था आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा-पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने विवेक जागर करंडक पथनाट्य स्पर्धा २०२६ चे आयोजित करण्यात आले आहे. हे सर्धेचे ८ वे वर्ष आहे. डॉ. दाभोलकरांच्या खूनाचा निषेध म्हणून "हिंसा के खिलाफ मानवता की ओर" हे सकारात्मक विचार देणारे अभियान राबवले जाते. या अभियानांतर्गत ही स्पर्धा घेतली जाते. यावर्षीचा स्पर्धेचा विषय "गुलामगिरी" आहे. महात्मा फुले यांच्या २०० व्या जन्मवर्षानिमित्त जरी हा विषय घेतला असला तरी सध्याचे गुलामगिरीचे स्वरूप अधिक व्यापक झालेले दिसते. सामाजिक, मानसिक, आर्थिक, राजकीय आणि विचार यांच्या प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष गुलामगिरीच्या स्वरूपांवर भाष्य करण्याची, तसेच त्यातून होणाऱ्या हिंसा आणि हत्या यावर अभिव्यक्तीची संधी या स्पर्धेतून उपलब्ध होणार आहे. १५ ते ३५ वर्षे खुला वयोगट असलेल्या इच्छुकांनी स्पर्धेत सहभागी होऊन विवेक, मानवता आणि परिवर्तनाचा संदेश पोहोचवू शकतात.

ही स्पर्धा २३ ऑगस्ट २०२६ रोजी पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे. इच्छुकांनी १६ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. कला, विचार आणि सामाजिक भान यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमातून तरुणांना अभिव्यक्तीचे प्रभावी साधन उपलब्ध होणार आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या




विवेकवादी चळवळीला, अंधश्रद्धा-विरोधी संकल्पनांना आणि हिंसा-विरोधी मानवतावादी मूल्यांना दिशा देण्यासाठी विवेक जागर करंडक २०२६ महत्वाचा ठरणार आहे.विचारांची ठिणगी, परिवर्तनाची ज्योत! लावण्यासाठी विवेक जागर करंडक २०२६" – सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.नावनोंदणी आणि अतिरिक्त माहितीसाठी तेजल (8652200724), तनुश्री (9224760056), प्रियांका (8652617382), आनंद (9664212870) आणि वैभव (9004742046) यांच्याशी संपर्क साधता येईल.

# शीलक्ष्मी सोशल फाउंडेशनतर्फे गरजू विद्यार्थ्यांना रेनकोटचे मोफत वाटप!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत रेनकोट वितरण अभियान उत्साहात पार पडले. विविध शाळांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना दर्जेदार रेनकोटचे वितरण करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांनी व्यक्त केलेले समाधान हे उपक्रमाचे यश अधोरेखित करणारे ठरले. यावेळी अध्यक्षा रजनी ताजणे म्हणाल्या, "प्रत्येक मुलाला कोणत्याही अडचणीशिवाय शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. पावसाळ्यात रेनकोट नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची शाळा चुकते. ही परिस्थिती बदलण्यासाठी शीलक्ष्मी सोशल फाउंडेशन सातत्याने सामाजिक उपक्रम राबवत असून भविष्यातही शिक्षण, आरोग्य व महिला सक्षमीकरण क्षेत्रात विविध लोकहिताचे प्रकल्प



राबविण्यात येणार आहेत.

या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शाळेत जाणे अधिक सुरक्षित व सोयीचे होणार असून पालकांनी या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. उपस्थित मान्यवरांनीही अशा उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे सांगत संस्थेच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.गरजू व वंचित घटकांसाठी सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबविणाऱ्या शीलक्ष्मी सोशल फाउंडेशनचा हा उपक्रम सामाजिक उत्तरदायित्वाचे उत्तम उदाहरण ठरला आहे.

# शिक्षक नसल्याने 'वांगी खुर्द'च्या चिमुकल्यांचे शैक्षणिक नुकसान

## विजय म्हस्के पाटील यांचे शिक्षणमंत्र्यांना साकडे

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील वांगी खुर्द (उर्दू) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. सध्या संपूर्ण शाळेचा गाडा केवळ एकाच शिक्षकाच्या भरवशावर सुरू असून, येथे तात्काळ पर्यायी शिक्षकाची नियुक्ती करावी, अशी मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी शिक्षणमंत्र्यांकडे ईमेलद्वारे केली आहे.

या शाळेत एकूण ४८ विद्यार्थी शिक्षण घेत असून प्रशासकीय मंजुरीनुसार शिक्षकांची ४ पदे मंजूर आहेत. मात्र, येथे केवळ २ शिक्षक कार्यरत होते. त्यातील एक शिक्षक २ जुलैपासून प्रसूती रजेवर गेल्याने, सर्व वर्गांच्या अध्यापनाची आणि प्रशासकीय कामांची जबाबदारी एकाच शिक्षकावर आली आहे. एकाच शिक्षकाने सर्व वर्ग सांभाळणे अशक्य असल्याने विद्यार्थ्यांचा 'शिक्षणाचा हक्क' धोक्यात आला आहे. यापूर्वी स्थानिक पातळीवर गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही दखल न घेतल्याने ग्रामस्थ आणि पालकांमध्ये तीव्र असंतोष आहे. प्रशासनाने तात्काळ अतिरिक्त शिक्षकाची नियुक्ती न केल्यास पालकांसह शाळेला कुलूप लावून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा विजय म्हस्के पाटील यांनी दिला आहे.

# अॅक्युपंक्चर उपचार शिक्षणाच्या विस्तारासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव वाडी नागपूर** : अॅक्युपंक्चर उपचार पद्धतीतून असंख्य रूग्णांना आपल्या व्याधीपासून मुक्त होण्यास मदत झाली आहे. तेवीस-चोवीस वर्षांपूर्वी मी स्वतः पाठदुखीने त्रस्त असताना या उपचार पद्धतीने मला तंदुरुस्त होता आले. या ज्ञानशाखेच्या विस्तारासाठी व याचे शैक्षणिक मार्ग वृद्धींगत व्हावेत, या दृष्टीने महाराष्ट्र शासन प्रयत्नशील असून शासकीय पातळीवर कोठेही कमतरता पडणार नाही, अशी नि:संदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर येथे आयोजित नॅशनल कॉन्फरन्स ऑन अॅक्युपंक्चर अॅक्यूकॉन 2026 च्या उदघाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी महाराष्ट्र काऊन्सील ऑफ अॅक्युपंक्चरचे डॉ. रूमी बेरामजी, इंडियन सोसायटी ऑफ मेडिकल अक्युपंक्चर या संस्थेचे अध्यक्ष डॉ. रमण कपूर यांच्यासह डॉ. नारायण नवले आणि डॉ. प्रदीप गुहा आदि मान्यवर उपस्थित होते.सिईंग इज बिलिव्हींग अर्थात आपण प्रत्यक्ष जे डोळ्याने पाहतो, त्यावर विश्वास दृढ करतो. अॅक्युपंक्चर उपचार पद्धती ही अशीच अनुभूतीची उपचार पद्धती आहे. या सर्वसमावेशक उपचार पद्धती अंतर्गत आपण ही उपचार पद्धती महत्त्वाची मानली आहे. या क्षेत्रापुढे असलेल्या अडचणींची मला जाणीव असून आम्ही शासनाच्या वतीने पूर्ण क्षमतेने या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ज्ञानशाखेला, उपचार पद्धतीला प्रतिष्ठा व शैक्षणिक मान्यता देण्यात दिलेले योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे. वेळोवेळी त्यांनी आमची भूमिका समजून घेत शासनस्तरावर असलेल्या अडचणी दूर केल्या असून त्यांच्या सहकार्यानेच महाराष्ट्रात ४ हजार ५०० पेक्षा अधिक नोंदणीकृत तज्ज्ञ अक्युप्रेशरची सेवा देत आहेत. यात साठ टक्के संख्या ही महिलांची असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे डॉ. रूमी बेरामजी यांनी यावेळी सांगितले. यावेळी डॉ. रमन कपूर यांनीही आपल्या मनोगतात शासनाच्या योगदानाला अधोरेखित केले.

# गेल्या तीन दशकापासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पवनी तालुक्यातील सुरबोडी गावाला भंडारा चे जिल्हाधिकारी सावन कुमार यांची भेट

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा** -गेल्या तीन दशकापासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या पवनी तालुक्यातील सुरबोडी गावाला भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार यांनी ९ जुलै २०२६ ला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील प्रकल्पग्रस्तांच्या समस्या जाणून घेतल्या. गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेले पवनी तालुक्यातील सुरबोडी हे गाव. शासनाच्या दप्तर दिरंगाई मुळे या गावाचे आजपर्यंत पुनर्वसन झालेले नाही. 125 कुटुंब असलेल्या व 95 टक्के आदिवासी ( एसटी ) तसेच तीन बाजूने प्रकल्पाचा पाणी व चौथ्या बाजूने घनदाट जंगलाने वेढलेला हे सुरबोडी गाव. आपले पुनर्वसन होईल या आशेने अनेक संकटे झेलत जीवन जगत आहे.

गावातील 93% शेतजमीन गोसीखुर्द प्रकल्पाच्या जलाशयात बुडालेली आहे. शासनाने शेती संपादित करून अल्पसा चाळीस हजार रुपये प्रति एकर मोबदला सुद्धा दिला. पर्यायी शेती



न दिल्यामुळे व मिळालेले पैसे खर्च झाल्यामुळे उदरनिर्वाहाचा साधनच हरपला. गावात रोजगार नाही. पाच , दहा किलोमीटर वरील दुसऱ्या गावात जाऊन मोलमजुरी करून जीवन जगावं लागत आहे. गावात एकही

दुकान नाही त्यामुळे चार ते पाच किलोमीटर अंतरावरील गावातूनच लागणाऱ्या वस्तू खरेदी करावे लागतात. गट- ग्रामपंचायत कार्यालय सुरबोडी गावापासून ५ किलोमीटर अंतरावर खापरी सौंदळ या पुनर्वसीत गावात आहे. गावाच्या सीमेतच प्रकल्पाच्या पाणी असल्यामुळे विषारी जलचर प्राण्यांचे गावातील प्रवेशामुळे भीती वाढलेली आहे. तर अड्याळ गावाकडे

जाणाऱ्या रस्त्यावर नेहमीच वाघाचे दर्शन होत आहे. यापूर्वी वाघांनी गावातील शेळ्या व जनावरे यांची शिकार केलेली आहे. गावात चौथ्या वर्गापर्यंत एक शिक्षक असलेली शाळा आहे. पाचव्या वर्गातील मुलांना अड्याळ गावात शिकायला जावे लागते. गावात एसटी महामंडळाची बस येत नाही. सतत भीतीच वातावरण असतो. गावात पिण्याच्या पाण्यासाठी एकमेव सार्वजनिक विहीर आहे. पण नाग नदीच्या प्रदूषित पाण्यामुळे गोसे जलाशयातील पाणी प्रदूषित झालेले असून गावातील विहिरीचे सुद्धा पाणी प्रदूषित झालेले आहे. पाणी पिण्यास योग्य नाही पाण्याची चव बदललेली आहे. पण

नायलजानी गावकरी याच पाण्याचा वापर करीत आहेत. माननीय जिल्हाधिकारी सावन कुमार व त्यांच्यासोबत आलेले अधिकारी व कर्मचारी यांनी गावात येऊन प्रत्यक्ष भेट घेतली. संपूर्ण गाव पिंजून काढला. गावकऱ्यांची सभा घेतली. प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या गावाची भौगोलिक परिस्थिती बघितली. व प्रकल्पग्रस्तांना आश्वासित केले की तुम्हाला गावापासून पाच किलोमीटर अंतरावरील अड्याळ ते कोंढा या राज्य मार्गावर जागा शोधून तुमचं पुनर्वसन करण्यात येईल. आज पासूनच शासन गावाच्या पुनर्वसनासाठी जागेचा शोध व संपादनाच्या कार्यवाहीला सुरुवात करीत असल्याचे सांगितले. व तसे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.या भेटीदरम्यान गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे संस्थापक संघटक चंद्रशेखर भिवगडे, संघर्ष समितीचे कार्यकर्ते राजेश आजबले, मनीषा भांडारकर, धनंजय मुलकलवार, रोशन भांडारकर, पूजा पाटील. खापरी ,सौंदळ ,सुरबोडी गट ग्रामपंचायत चे सरपंच मनोहर खंगार उपस्थित होते.

# सुलेमान देवळा परिसरांत बिबट्यांची पुन्हा दहशत; लोकवस्तीत घुसून गाय केली ठार

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा प्रतिनिधी बाळासाहेब रक्ताटे** : आष्टी तालुक्यातील मोजे सुलेमान देवळा गावात बिबट्याची पुन्हा दहशती इंट्री झाली आहे . काल दिनांक 9 जुलै 2026 रोजी, सुलेमान देवळा गावातील डहाळे वस्तीवर मध्यरात्री दोन किंवा अनेक बिबट्यांनी दहशत माजवत, शेतकरी श्री. मदन आसाराम डहाळे यांच्या राहत्या घराच्या पढवीतुन मध्यरात्री बिबट्यांनी , दोन वर्ष वयाची लागवडी योग्य कालवढ मारून, किमान एक हजार फूट ओढत नेऊन अर्धवट धड खाऊन घेतल्याच्या अवस्थेत सकाळी निदर्शनात आली. ही माहिती गावातील समाजसेवक श्री. परमेश्वर रामचंद्र घोडके यांनी वन विभागालां दिली. सुलेमान देवळा गावातील सर्वे नंबर 24



> गेल्या वर्षीपासून जुन ते फेब्रुवारी दरम्यान कायम बिबटे गाव व परिसरात मुक्कामी आहेत. वनविभाग नागरिकांची जिविताशी खेळतंय. तुमचे प्राणी तुम्ही संभाला अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करू
> **समाजसेवक श्री परमेश्वर रामचंद्र घोडके**

मध्ये, सदर डहाळे वस्ती असून, चार-पाच कुटुंब कायम तिथे गेल्या वीस वर्षापासून निवासी कायमस्वरूपी स्थायिक आहेत. अशा लोक वस्तीत बिबट्या घुसून तीनशे ते साडेतीनशे किलो वजनाची कालवड गाय मारून ओढून नेऊन खालल्यामुळे पिसरात बिबट्याची दहशत ही कायमचं आहे . वनविभागाचे कर्मचारी श्री. कानीफ पवार वैद्यकीय अधिकारी यांनी सदर घटनेचा पंचनामा व पी एम केले आहे. वन अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन किंवा अधिक बिबटे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी सतर्क रहावे अशा सूचना वन विभागाकडून देण्यात आली आहेत.

# चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी, पदव्युत्तर वर्गातील व पी.एच. डी. पुरस्कृत गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा सोमवार दिनांक १३ जुलै २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्थान स्व. श्री. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून आयोजित केला आहे.

स्व. श्री. चांगू काना ठाकूर साहेब यांचे जीवन साधेपणा, तत्त्वनिष्ठा आणि समर्पणाचे प्रेरणादायी उदाहरण होते. त्यांच्या स्मरणार्थ मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब (माजी खासदार) यांनी पनवेल परिसरातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या उद्देशाने चांगू काना ठाकूर आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) या महाविद्यालयाची स्थापना केली. दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची परंपरा जपली जाते. विविध परीक्षांमध्ये गुणवंत यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन दिले जाते त्यामुळे उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी विध्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता मा. डॉ. कविता लघाटे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे मा. आमदार श्री. प्रशांत ठाकूर साहेब उपस्थित राहणार आहेत.

या प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन मा. श्री. वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. नितीन पाटील, नगरसेवक पनवेल महानगरपालिका व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य मा. श्री. परेश ठाकूर व संस्थेचे सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती या सोहळ्याला लाभणार आहे.

या सोहळ्यामध्ये सर्व पालक व विध्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य मा. प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी केले आहे. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी परिषद व विद्यार्थी कल्याण कक्षाचे चेअरमन डॉ. एस. एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव व महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. आर.डी.म्हात्रे विशेष प्रयत्न करत आहेत. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सुद्धा सक्रीय सहभाग घेत आहेत.

# अविनाश पाठक लिखित "आयुष्यातले सांगाती" चे प्रकाशन होणार

## साहित्य भारती आणि साईज्योती पब्लिकेशन्स चे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : ज्येष्ठ पत्रकार, स्तंभलेखक आणि साहित्यिक अविनाश पाठक लिखित आयुष्यातले सांगाती भाग १ भाग २ आणि भाग ३ चे प्रकाशन गुरुवार दिनांक १६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता नवदृष्टी सभागृह, अंध विद्यालय परिसर, दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर येथे होणार आहे. अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती, विदर्भ प्रांत, आणि साईज्योती पब्लिकेशन च्या संयुक्त विद्यमाने आयोजित एका समारंभात महाराष्ट्राचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांचे हस्ते हे प्रकाशन होणार असून माजी राज्यपाल आणि भारतीय विद्या भवन चे राष्ट्रीय अध्यक्ष बनवारीलालजी पुरोहित हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक प्रकाश एदलाबादकर पुस्तकांवर भाष्य करणार आहेत.

आपल्या ५४ वर्षांच्या पत्रकारिता आणि सामाजिक जीवनाच्या कालखंडात ज्या अनेक मान्यवर व्यक्तींशी अविनाश पाठक यांचे व्यक्तिगत संबंध आले आणि ते उभयपक्षी जपले गेले, अशा एकूण ५१ मान्यवर व्यक्तींवर अविनाश पाठक यांनी लेख लिहिले असून त्याचे संकलन तीन भागात साईज्योती पब्लिकेशन ने "आयुष्यातले सांगाती" भाग १, २ आणि ३ असे प्रकाशित केले आहेत. या ५१ मान्यवर व्यक्तींमध्ये माजी पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव, माजी लोकसभा अध्यक्ष मनोहर जोशी, ज्येष्ठ साहित्यिक विद्याधर गोखले, गिरिजा कीर, नाट्य दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्योगपती शक्तीकुमार संचेती, पत्रकार मा.गो. वैद्य, संघ प्रचारक लक्ष्मीनारायण भाला, प्राच्यविद्या संशोधक महामहोपाध्याय डॉ वासुदेव विष्णू मिराशी, पत्रकार नीला उपाध्ये, सुरेश द्वादशीवार, श्रीपाद सहस्रभोजने, राम खांडेकर, अनंत तरे, डॉ. तनुजा नाफडे, दत्ता मेघे, डॉ. प्रफुल्ल मोकदम, सरसंघचालक डॉ. मोहन भागवत. प्रमिलाताई मेढे, डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. विकास महात्मे, अजय संचेती, चैनसुख संचेती, डॉ विश्वास मेहेंदळे, सुधीर गाडगीळ, डॉ उदय निरगुडकर, हंसराज अहिर, वामनराव चोरघडे, मारोती चितमपल्ली, शुभांगी भडभडे, भगतसिंह कोशियारी, उल्हास पवार, न्या. विकास सिरपुरकर, डॉ वि.भि.कोलते, गोपीनाथ मुंडे, प्रा बी.टी. देशमुख, डॉ श्रीकांत जिचकार, वसंतराव साठे, डॉ मनोहर पिंगळे, अभिनंदन थोरात, गंगाधरराव फडणवीस,दत्ताजी डिडोळकर, कवी अनिल, डॉ मधुकर आष्टीकर, प्रतापदादा सोनवणे,नीतिन केळकर,सद्गुरुदास महाराज, डॉ प्रमोद कोलवाडकर या मान्यवरांचा समावेश आहे. या तीन भागांना डॉ. नीलम गोऱ्हे, डॉ. विकास महात्मे आणि अजय संचेती यांच्या प्रस्तावना आहेत.

अविनाश पाठक यांची यापूर्वी एकूण पंधरा पुस्तके प्रकाशित झाली असून त्यात डावपेच, शह काटशह आणि सत्तेच्या सावलीत हे तीन राजकीय कथासंग्रह, गाभाऱ्यातला कवडसा, माझ्या खिडकीतले आकाश, आठवणीतले नेते, थोडं आंबट थोडं गोड आणि हितगुज हे ललित लेखांचे संग्रह, दाहक वास्तव, मागोवा घटितांचा, कालप्रवाहाच्या वळणांवरून आणि दृष्टीक्षेप हे वैचारिक लेखांचे संग्रह, काळ्या कोळशाची काळी कहाणी हे देशातील गाजलेल्या कोळसा घोटाळ्यावरील पुस्तक, पूर्णांक सुखाचा ही लघु कादंबरी, आणि मराठी वांङ्मय व्यवहार: चिंतन आणि चिंता हे संपादित पुस्तक यांचा समावेश आहे. यातील काही पुस्तके विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित झालेली आहेत.

या समारंभाला नागरिकांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीचे विदर्भ प्रांत अध्यक्ष चंद्रकांत लाखे, कार्याध्यक्ष डॉ शेखर भुसारी, महामंत्री विनय माहुरकर साईज्योती पब्लिकेशन चे ज्योती खापेकर, गणेश राऊत प्रभृतींनी केले आहे.

# स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्थेचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : स्थानिक स्व. झुलनबाई बहुउद्देशीय संस्था, गोंदियाचा तिसरा वर्धापन दिन गोविंदपूर रोड येथील सतनाम नशा मुक्ती केंद्रात ९ जुलै रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम संत कबीर साहेब व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी डॉ. लोकेश कुमार चिर्वतकर उपस्थित होते.प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या अध्यक्षा सौ. मंगला शेंद्रे (चिर्वतकर), उपाध्यक्ष सचिनभाऊ बन्सोड , संस्थेचे सचिव टी. वाय. चिर्वतकर, तसेच कार्यकारिणी सदस्य कृष्णकुमार कापसे, सौ. सुनीता सव्वालाखे, रुतिका इलमकर, सुभाष सोनेवाने आणि प्रदीप चिर्वतकर प्रामुख्याने उपस्थित होते.



**गरीब लाभार्थ्यांना मिळणार सवलत**

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. लोकेश कुमार चिर्वतकर यांनी संस्थेच्या आतापर्यंतच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच भविष्यात संस्थेच्या वतीने गरीब व गरजू लाभार्थ्यांना विशेष सवलत दिली जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी आपल्या भाषणात केली. संस्थेचे उपाध्यक्ष सचिनभाऊ बन्सोड यांनीही उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव टी. वाय. चिर्वतकर यांनी मांडले, तर संचालन सौ. सुनीता सव्वालाखे मॅडम यांनी केले. उपस्थितांचे आभार लक्ष्मी पटेल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कु. कीर्ती शिवणकर आणि मधूभाऊ राऊत यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक व संस्थेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकछत्री नेतृत्वाची किंमत कोण मोजणार?

महाराष्ट्र भाजप आज सत्तेत आहे. संघटन मजबूत आहे, संसाधनांची कमतरता नाही आणि केंद्राचे पाठबळही आहे. तरीही पक्षाच्या अंतर्गत राजकारणाबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. हे प्रश्न विरोधकांनी निर्माण केलेले नाहीत; ते पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले तरी समोर येतात.

भाजपच्या वाढीत अनेक नेत्यांचे योगदान होते. गोपीनाथ मुंडे यांनी ग्रामीण महाराष्ट्रात पक्षाची मुळे रुजवली. एकनाथ खडसे यांनी उत्तर महाराष्ट्रात संघटना उभी केली. विनोद तावडे यांनी मुंबई आणि शिक्षण क्षेत्रात काम केले. चंद्रकांत पाटील यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. तरी आज या सर्व नेत्यांची राजकीय भूमिका पूर्वीइतकी प्रभावी दिसत नाही, अशी चर्चा वारंवार ऐकू येते.

याच पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाविषयी दोन परस्परविरोधी मते दिसतात. समर्थकांच्या मते त्यांनी कठीण




परिस्थितीत पक्षाला सत्तेच्या केंद्रस्थानी ठेवले, तर टीकाकारांचे म्हणणे आहे की पक्षात पर्यायी नेतृत्व विकसित होण्याची संधी कमी झाली.

लोकशाहीतील कोणत्याही मोठ्या पक्षाची खरी ताकद एका व्यक्तीत नसते; ती विविध विचारांचे, विविध प्रदेशांचे आणि विविध समाजघटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेतृत्वात असते. जेव्हा निर्णयप्रक्रिया एका केंद्राभोवती फिरू लागते, तेव्हा कार्यकर्त्यांमध्ये आणि ज्येष्ठ नेत्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होण्याचा धोका वाढतो.

महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात केवळ निवडणुका जिंकणे पुरेसे नसते; पक्षाची अंतर्गत एकजूटही तितकीच महत्त्वाची असते. जर अनुभवी नेत्यांना योग्य स्थान मिळाले नाही, तर त्याचा परिणाम संघटनेवर आणि भविष्यातील राजकीय समीकरणांवर होऊ शकतो.

केंद्रीय नेतृत्वासमोरही हे मोठे आव्हान आहे. राज्यातील सर्व गटांमध्ये समन्वय राखणे, अनुभवी नेतृत्वाचा सन्मान करणे आणि नव्या नेतृत्वालाही संधी देणे ही पक्षाच्या दीर्घकालीन बळकटीसाठी आवश्यक बाब आहे.

राजकारणात कोणताही नेता कायम अपरिहार्य नसतो. व्यक्तीपेक्षा संघटना मोठी आणि संघटनेपेक्षा जनता मोठी असते. म्हणूनच कोणत्याही पक्षाने व्यक्तिकेंद्रित नेतृत्वापेक्षा सामूहिक नेतृत्वाला प्राधान्य दिले, तरच तो पक्ष दीर्घकाळ जनतेचा विश्वास टिकवू शकतो.

# भादलवाडीत विद्यार्थ्यांना मोफत स्कूल किट वाटप

## वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : भादलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वर्चस्व ग्रुपचे अध्यक्ष संतोष (भाऊ) कुताळ यांच्या वतीने मोफत शालेय साहित्य (स्कूल किट) वाटपाचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या सौ.सोनाली जाधव,सौ.मेघा बंडगर,भरणे प्रतिष्ठानच्या सौ. अनुष्का भरणे,श्री.दीपक जाधव,ॲड.पूजा घोलप, इंदापूर नगरपालिकेचे नगरसेवक श्री.सुधाकर ढगे, नगरसेविका सौ.मयुरीताई उंबरे तसेच भादलवाडीचे सरपंच श्री.शिवाजी कान्हेरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला प्रोत्साहन देण्यात आले.तसेच वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शिक्षणासोबत पर्यावरणाबाबतही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता



निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.या समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याची संधी मिळाल्याबद्दल वर्चस्व ग्रुपच्या सर्व समन्वयकांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.कार्यक्रमास वर्चस्व ग्रुपचे अध्यक्ष संतोष (भाऊ) कुताळ,उपाध्यक्ष शैलेश परकाळे,अमोल जाधव, विशाल शिंदे,हनुमंत विरकर,अल्ताफ शेख, अजित शिंदे,राहुल भागडे,कपिल लांडगे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एच पी सी एल तर्फे रायगड जिल्हा परिषद शाळा चावणे येथे 'स्वच्छता पखवाडा' मोहीम उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (HPCL) च्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, चावणे येथे 'स्वच्छता पखवाडा' ही विशेष मोहीम अत्यंत उत्साहात राबविण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करणे आणि त्यांना चांगल्या सवयींची ओळख करून देणे हा होता.

या कार्यक्रमाला HPCL चे मॅनेजर मरुला स्वामी आणि HPCL चे सुपरवायझर प्रवीण लबडे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच चावणे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुलभा तायडे व इतर शिक्षिका उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक



करण्यात आले व त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या दैनंदिन गरजा आणि पावसाळ्याचे दिवस लक्षात घेऊन उपयुक्त वस्तूंचे वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना पेन्सिल किट, छत्री, आणि स्केचपेन यांचे वाटप करण्यात आले.

शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी HPCL तर्फे शाळेला डस्टबिन, झाडू यांसारखे स्वच्छता साहित्य भेट देण्यात आले.

केवळ साहित्याचे वाटप न करता, मुलांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व रुजवण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या विषयावर अतिशय सुंदर आणि संदेशात्मक ड्रॉइंग काढली.

तसेच मुलांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे अभ्यासपूर्ण निबंध देखील लिहून काढले.


स्पर्धेत सहभागी झालेल्या आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या सर्व मुलांना प्रोत्साहनपर गिफ्ट्स देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी, शाळेच्या आवारात मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. निसर्गाचे रक्षण आणि परिसराची स्वच्छता राखण्याची प्रतिज्ञा या वेळी सर्वांनी घेतली. शाळेच्या मुख्याध्यापिका सुलभा तायडे यांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल HPCL प्रशासनाचे व उपस्थित अधिकाऱ्यांचे मनापासून आभार मानले.

# तहसीलदार कार्यालयात नियमांची पायमल्ली; आय-कार्डशिवाय कर्मचाऱ्यांचा बिनधास्त वावर, जबाबदार कोण?

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : नागरिकांनी शासकीय कार्यालयात नियमांचे काटेकोर पालन करावे, अशी अपेक्षा प्रशासनाकडून सातत्याने व्यक्त केली जाते. मात्र, निफाड तहसीलदार कार्यालयात अनेक अधिकारी व कर्मचारी आय-कार्डशिवाय वावरत असल्याचे चित्र समोर आले असून, शासकीय नियमांची अंमलबजावणी नेमकी कोणासाठी, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला



जात आहे.

कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी नेमके कोण आहेत, याची ओळख पटत नसल्याने गैरसोय होत आहे. आय-कार्ड नसल्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, शासकीय कार्यालयातच नियमांना हरताळ फासला जात असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, एका कर्मचाऱ्याला नाव विचारले असता "तहसीलदार साहेबांनाच विचारा," असे उत्तर दिल्याचा दावा संबंधित नागरिकांनी केला. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, शासकीय कर्मचाऱ्यांकडून अपेक्षित असलेल्या जबाबदार व सौजन्यपूर्ण वर्तनावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

हा प्रकार पत्रकार राजेश भडांगे यांनी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या निदर्शनास आणून दिला आहे. आता या प्रकरणाची सखोल चौकशी करून आय-कार्डशिवाय वावरणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासकीय नियमांनुसार कारवाई होणार का, तसेच भविष्यात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आय-कार्ड परिधान करणे सक्तीचे करण्याबाबत स्पष्ट आदेश दिले जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# आ.जितेश अंतापूरकर यांची आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे पाठपुरावा

**दैनिक युवक आधार**

**देगलूर प्रतिनिधी** : देगलूर विधानसभा मतदारसंघाचे आ.जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाशजी आबिटकर यांची भेट घेऊन देगलूर (जि.नांदेड) येथे ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय मंजूर करण्यात यावे तसेच त्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा,अशी ठोस मागणी केली.

यावेळी आमदार जितेश अंतापूरकर यांनी देगलूर परिसरातील महिलांना भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांची सविस्तर माहिती आरोग्यमंत्री यांना देत,संबंधित प्रस्ताव शासन दरबारी प्रलंबित असून,तो विशेष बाब म्हणून तातडीने मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याची विनंती यावेळी त्यांनी केली.

या मागणीसाठी यापूर्वीही आ.अंतापूरकर यांनी सातत्याने पाठपुरावा करण्यात आला असून,राज्याचे तत्कालीन सार्वजनिक आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना १५ फेब्रुवारी २०२२ रोजी तसेच तत्कालीन आरोग्यमंत्री तानाजीराव सावंत यांना २० जानेवारी २०२३ रोजी पत्रव्यवहार करून देगलूर येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालयाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली होती.त्या पत्रव्यवहाराचाही संदर्भ देत यावेळी पाठपुरावा आ.अंतापूरकर यांच्याकडून करण्यात आला.

देगलूर हे महाराष्ट्र,तेलंगणा आणि कर्नाटक या तीन राज्यांच्या सीमेवरील महत्त्वाचे शहर असून,भौगोलिकदृष्ट्या मोठ्या तालुक्याचे केंद्र आहे.या परिसरातील नागरीक विविध आरोग्य सेवांसाठी देगलूरवर अवलंबून आहे.दररोज मोठ्या संख्येने गरीब,गरजू आणि ग्रामीण भागातील रुग्ण उपचारासाठी येथे येत असतात. त्यामध्ये गरोदर माता व महिला रुग्णांचे प्रमाण लक्षणीय आहे.

दरम्यान महिला भगिनींना प्रसूतीदरम्यान किंवा महिलांच्या आरोग्याशी संबंधित आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास रुग्णांना जवळपास ९० किलोमीटर अंतरावरील नांदेड जिल्हा रुग्णालयात संदर्भित (रेफर) करावे लागते.या प्रदीर्घ प्रवासामुळे गरोदर माता व नवजात बालकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. परिणामी,महिला रुग्णांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

देगलूरसह सीमावर्ती ग्रामीण भागातील महिलांना वेळेत,सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हाव्यात,यासाठी ५० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय उभारणे ही काळाची गरज असल्याचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी आरोग्य मंत्री यांच्या निदर्शनास आणून देत हा प्रस्ताव तातडीने मंजूर करून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

# जि. प. शाळेत प्रवेश घेतल्यास 'घर टॅक्स' होणार माफ; मुरमाडी ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक ठराव

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : सध्याच्या काळात गल्लोगल्ली खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पेव फुटले असून पालकांचा कलही तिकडे वाढताना दिसतो आहे. यामुळे गाव खेड्यातील हक्काच्या जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा ओस पडता आहेत. मात्र, यावर लाखनी तालुक्यातील मुरमाडी (सावरी) ग्रामपंचायतीने एक अत्यंत क्रांतिकारी आणि ऐतिहासिक तोडगा काढला आहे .

आपल्या गावची जिल्हा परिषद मराठी शाळा टिकली पाहिजे आणि ते समृद्ध झाली पाहिजे. या उदात्त हेतूने मुरमाडी (सावरी) ग्रामपंचायतीचे धडाडीचे सरपंच शेषराव वंजारी यांनी एक अभिनव घोषणा केली आहे . उत्तर बुनियादी जिल्हा परिषद शाळा मुरमाडी येथे जे पालक आपल्या पाल्यांचा प्रवेश घेतील, त्यांचा २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षाचा संपूर्ण घर टॅक्स (घरपट्टी) माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे .



या कल्पक पण तितक्याच प्रभावी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सरपंच शेषराव वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार ,१५ मे २०२६ रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या वार्षिक सभेत या विषयावर सखोल चर्चा करून विशेष ठराव मंजूर करण्यात आला. त्यानंतर, गावकऱ्यांच्या उपस्थितीत २९ मे २०२६ रोजी आयोजित ग्रामसभेत या निर्णयावर एकमताने शिक्कामोर्तब करण्यात आले. गावकऱ्यांनी सुद्धा या अभिनव निर्णयाचे स्वागत केले असून, संपूर्ण तालुक्यात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू आहे. जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी प्रवेशानंतर पालकांचा घरकर माफ करणार. मुरमाडी (सावरी) ही तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

**शाळेच्या पटसंखेत सातत्याने वाढ**

सरपंच शेषराव वंजारी यांनी शाळा व्यवस्थापन समिती आणि शिक्षकांच्या मदतीने घेतलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे मुरमाडी जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थी संख्या (पटसंख्या) दरवर्षी लक्षणीय रित्या वाढत आहे. खाजगी इंग्रजी शाळांच्या झगमगाटाला मागे टाकत ग्रामीण भागातील पालकांनी पुन्हा एकदा जिल्हा परिषद शाळेवर विश्वास दाखवला आहे. वर्षनिहाय वाढती पटसंख्या शाळेच्या प्रगतीचा आलेख अधोरेखित करीत आहे . सन २०२०-२१ मध्ये केवळ ३२ विद्यार्थ्यांवर असणारी शाळा आज चालू शैक्षणिक वर्षात ७४ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली आहे. जिल्हा परिषद शाळेतील वर्ग १ ते ४ मध्ये अध्ययन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा आर्थिक वर्ष २०२६-२७ चा मुरमाडी ग्रामपंचायतीने घेतलेला हा 'घर टॅक्स माफ' चा निर्णय संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकवण्यासाठी व शाळांच्या प्रगतीसाठी एक नवा पथदर्शी पॅटर्न ठरेल. असा विश्वास व्यक्त केला जात आहे .

आपल्या गावची जिल्हा परिषद मराठी शाळा हे गावाचे वैभव आहे. ती टिकली पाहिजे आणि गोरगरिबांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मोफत मिळाले पाहिजे. यासाठी आम्ही घरपट्टी माफीचा हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. मुरमाडी चे सरपंच शेजराव वंजारी यांनी हाती घेतलेला हा उपक्रम अत्यंत सुंदर व वाखण्यासारखा असल्याचे शिक्षण क्षेत्रात बोलले जाते. हा पॅटर्न नक्कीच यशस्वी ठरेल .

# ज्ञानविकास विद्यालयात १२७५ रोपांचे वाटप; वृक्षवल्ली टीमचा पुढाकार

## 'एक विद्यार्थी, एक झाड' उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांकडून वृक्ष संगोपनाची शपथ

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील ज्ञानविकास प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरणाशी मैत्री करून पर्यावरण समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड व संगोपन करावे, या उद्देशाने 'वृक्षवल्ली टीम, सिल्लोड'च्या पुढाकाराने 'एक विद्यार्थी, एक झाड' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या मोहिमेत १२७५ रोपांचे वाटप करण्यात आले.



वृक्षांची जोपासना कुटुंबातील सदस्याप्रमाणे कराः- अश्विनी लाठकर

'डॉ. शेखर दौड आणि वृक्षवल्ली टीम सिल्लोड दरवर्षी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन झाडे लावण्याची भावना त्यांच्यामध्ये रुजवतात. विद्यार्थी जीवनामध्ये एकदा का निसर्गाबद्दलची ओढ निर्माण झाली की, ते आयुष्यभर निसर्गासाठी कार्य करतात. कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वृक्षांना जीव लावून त्यांची जोपासना करा. शासन आदेशाप्रमाणे शिक्षण विभागाचे आवाहन आहे की, शाळा, विद्यार्थी आणि शिक्षकांनी अधिक क्षमतेने सहभागी होऊन ही वृक्ष लागवड व संगोपन चळवळ यशस्वी करावी.'

— श्रीमती अश्विनी लाठकर, शिक्षणाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.

या उपक्रमात जांभूळ, जांब, कडुलिंब, चिंच व कारंजा यांसारख्या झाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. रोपांची लागवड कशी करावी व त्यांचे संगोपन कसे करावे, यासाठी वृक्षवल्ली टीमचे अध्यक्ष डॉ. शेखर दौड, योगेश दिवटे, डॉ. संदीप गायकवाड, डॉ. दीपक अपार, गजानन काकडे, अशोक सुरडकर आणि श्री. ब्रह्मा यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शपथ घेतली की, "आम्ही पर्यावरणाचा समतोल सुयोग्य ठेवण्यासाठी व रक्षण करण्यासाठी, प्रत्येकाने झाड तोडणे टाळून किमान दहा झाडे लावून त्यांचे संगोपन करू. पाणी, हवा व मातीशी मैत्री करून प्रदर्शन टाळू. वृक्षतोड होऊ नये म्हणून जनजागृती करत इतरांना झाडे तोडू देणार नाही. स्वच्छ व शुद्ध ऑक्सिजन मिळण्यासाठी परिसर हिरवागार ठेवण्याची माझी जबाबदारी असून, 'वृक्ष लागवड करूया, पर्यावरण वाचवूया' अशी शपथ आम्ही सर्व मिळून घेतो." तसेच, वृक्ष लागवड करणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय पातळीवर 'ऐच्छिक गुण' मिळावेत, असे आवाहन वृक्षवल्ली टीमच्या वतीने करण्यात आले.

पर्यावरण पूरक उपक्रमांना प्रोत्साहनः- अशोकदादा गरुड

'योग्य लागवड करून वृक्षांचे संगोपन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य बक्षीस देऊन प्रोत्साहन दिले जाईल. पर्यावरण पूरक उपक्रम वाढीसाठी आमची संस्था सदैव प्रयत्नशील राहील.'

— अशोकदादा गरुड, प्रमुख, शैक्षणिक समूह.

### आज भंडारा शहरात प्रथमच उतरणार विदर्भातील ५०० च्या वर पत्रकार

# पोलीस बहुउद्देशीय सभागृहात रवि. १२ जुलैला "पत्रकार हक्क परिषद" चे अभिनव आयोजन

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : पत्रकारांचे संरक्षण, हक्क आणि न्यायासाठी "व्हॉईस ऑफ मीडिया" च्या वतीने २० वर्षांनी प्रथमच भंडारा जिल्ह्यात विदर्भातील ५०० हून अधिक पत्रकार उतरणार आहेत. आज रविवार १२ जुलैला दु. १ वा. पोलीस बहुउद्देशीय सभागृह भंडारा येथे "पत्रकार हक्क परिषद" व विविध गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या भव्य दिव्य सोहळ्याला जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह अनेक दिग्गज राजकीय व प्रशासकीय नेते एकाच विचार पिठावर उपस्थित राहणार आहेत. या परिषदेच्या अंतर्गत माजी सैनिकांचा तसेच जिल्ह्यातील पत्रकारांच्या प्राविण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

याप्रसंगी परिषदेचे मुख्य मार्गदर्शक "व्हॉईस ऑफ मीडिया" चे संस्थापक व केंद्रीय अध्यक्ष संदीप काळे हे असतील. तर संघटनेचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष अनिल मसके, संचालक किशोर करंजेकर, कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख, विदर्भ विभाग अध्यक्ष व्यंकटेश दुडमवार आणि गडचिरोलीचे प्रवक्ता नसिर हाशमी यांच्या प्रमुख उपस्थितीत व विशेष अतिथी मध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे, उद्योजक जयंत गज्जर, हिंदवी प्रतिष्ठान संस्थापक जॅकी रावलानी, उद्योजक डिम्पल मल्होत्रा, रूपेश टांगले, विशेष निमंत्रित मध्ये भंडारा जिल्हाधिकारी सावन कुमार व जिल्हा पोलीस अधिक्षक नुरूल हसन यांची उपस्थिती लाभणार आहे. रविवार ता. १२ जुलैला सायं. ०४ वाजता देशासाठी लढलेल्या वीर जवान माजी सैनिकांचा सत्कार, पत्रकारांच्या प्राविण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्याला प्रमुख उपस्थिती पालकमंत्री ना. पंकज भोयर, खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार डॉ. परीणय फुके, आ. अविनाश ब्राह्मणकर, आ. नरेंद्र भोंडेकर, आ. नाना पटोले, आ. राजू कारेमोरे, जि. प. अध्यक्ष कविता उईके, माजी खा. सुनील मेंढे, जि. प. उपाध्यक्ष एकनाथ फेंडर, नाना पंचबुध्दे, माजी आ. चरण वाघमारे, भाजपा जिल्हाध्यक्ष आशु गोंडाणे, शिवसेना अध्यक्ष अनिल गायधने, कॉंग्रेस अध्यक्ष मुकूंद गायधने, शिवसेना ( उबाठा ) अध्यक्ष संजय रेहपाडे हे प्रामुख्याने उपस्थित असतील.




याचबरोबर या भव्य दिव्य सोहळ्याला संगीतमय सांस्कृतिक कार्यक्रमात बॉलिवूड गायिका राधा खुळे व प्रणय सतलज यांच्या "पाटलांचा बैलगाडा" हा सदाबहार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सदर संपूर्ण कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन व्हॉईस ऑफ मीडिया भंडारा जिल्हा अध्यक्ष शशिकांत भोयर यांनी केले आहे.

# 'डॉ. अण्णा भाऊ साठे संघर्ष सेना'च्या राज्य अध्यक्षपदी साहेबराव दनके, तर प्रदेशाध्यक्षपदी राजू साठे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी आणि प्रलंबित प्रश्न लोकशाही मार्गाने सोडवण्यासाठी 'डॉ. अण्णा भाऊ साठे संघर्ष सेना' (महाराष्ट्र राज्य) या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. सिल्लोड येथे आयोजित समविचारी कार्यकर्त्यांच्या बैठकीत संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

संदीप मानकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस डॉ. सचिन साबळे, पंडित आव्हाड, विजय आव्हाड आणि करण कांबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बैठकीत मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यस्तरावर संघटित होऊन कार्य करण्याचा निर्धार करण्यात आला. सर्व उपस्थित मान्यवरांच्या एकमताने 'डॉ. अण्णा भाऊ साठे संघर्ष सेना'



(महाराष्ट्र राज्य) च्या संस्थापक राज्य अध्यक्षपदी साहेबराव दनके, तर राज्य प्रदेशाध्यक्षपदी राजू साठे यांची निवड करण्यात आली.

यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मार्गदर्शन करताना डॉ. सचिन साबळे यांनी सांगितले की, समाजाची स्थिती सुधारण्यासाठी सर्वांनी एकदिलाने कार्यरत राहणे ही काळाची गरज आहे. गेल्या ४५ वर्षांपासून प्रलंबित असलेले हिंदू मातंग समाजाचे सामाजिक व विधायक प्रश्न सोडवण्यासाठी ही संघटना लोकशाही मार्गाने व संविधानात्मक चौकटीत राहून विविध आंदोलने करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

राज्य स्तरावरील संघटनेच्या इतर विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या लवकरच जाहीर केल्या जातील, अशी माहिती नूतन संस्थापक राज्य अध्यक्ष साहेबराव दनके यांनी दिली. या बैठकीला शिवराम कांबळे, लखन साठे, ज्ञानेश्वर साठे, नारायण साठे, त्रिंबक शेजवळ, शुभम आव्हाड, विश्वजीत साबळे , सखाराम भिसे, ओमकार आव्हाड, दुर्गादास जाधव , मधुकर साठे, ज्ञानेश्वर शेजुळ , भागवत शेजुळ, संजय घोरपडे, गणेश सोनवणे, गणेश दनके , परमेश्वर दणके, उमेश सोनवणे, समाधान लोखंडे, सुनील शिरसाट, एकनाथ आगम , बबन दणके, मनोज दणके , सदानंदन दणके, संदीप शिरसाट, बापू आव्हाड, भिकन कांबळे, सचिन शेजुळ, विशाल आहेरे , फकीरराव सोनवणे, कृष्णा दनके, दिगंबर नाडे, बापू शिरसाठ, सागर दनके, संतोष आगाम यांसह सिल्लोड, सोयगाव, फुलंब्री व अजिंठा परिसरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळा, महाविद्यालय परिसरात पिंपळगाव पोलिसांची धडक मोहीम; रोडरोमिओ, टवाळखोरांवर कारवाई

## बसस्थानक, कोचिंग क्लासेस परिसरात अचानक तपासणी; एका टवाळखोराविरुद्ध गुन्हा दाखल, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी कठोर भूमिका

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : विद्यार्थिनी, महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित आणि निर्भय वातावरण मिळावे, यासाठी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बसस्थानक, शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस परिसरात पिंपळगाव पोलिसांनी विशेष धडक तपासणी मोहीम राबवली. अचानक राबविण्यात आलेल्या या कारवाईमुळे रोडरोमिओ, टवाळखोर आणि विनाकारण गर्दी करून सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. अनेकांनी पोलिसांची चाहूल लागताच परिसरातून पळ काढल्याचे चित्र पाहायला मिळाले.





पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आंबादास बैरागी, पोलीस अंमलदार विकास वाळूज, सागर धात्रक आणि प्रशांत उगले यांच्या पथकाने शाळा-महाविद्यालयांच्या प्रवेशद्वारांजवळ, बसस्थानक परिसरात तसेच विविध कोचिंग क्लासेसच्या आसपास पायी गस्त घालत संशयित व्यक्तींची कसून चौकशी केली. या वेळी संशयास्पद हालचाली करणाऱ्या व्यक्तींची ओळख पडताळण्यात आली तसेच विनाकारण थांबलेल्या युवकांना समज देण्यात आली.

तपासणीदरम्यान शैक्षणिक काम नसताना शाळा व महाविद्यालय परिसरात घुटमळणारे, विद्यार्थिनींकडे पाहून शिट्ट्या मारणे, अश्लील हावभाव करणे, मोठ्याने आरडाओरडा करून सार्वजनिक शांततेचा भंग करणे, रोडरोमिओगिरी करणे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांनी कठोर भूमिका घेतली. या मोहिमेदरम्यान एका टवाळखोराविरुद्ध पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, इतर संशयितांना कठोर समज देण्यात आली.

पोलिसांनी शाळा व महाविद्यालय प्रशासनाशी तसेच परिसरातील नागरिकांशी संवाद साधत कोणतीही संशयास्पद घटना अथवा छेडछाडीचा प्रकार निदर्शनास आल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अशा धडक मोहिमा यापुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

पिंपळगाव पोलिसांच्या या धडक कारवाईचे विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून, शैक्षणिक परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी अशा मोहिमा नियमितपणे राबविण्याची मागणीही नागरिकांनी व्यक्त केली आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून पोलिसांनी दिला आहे.

'विद्यार्थ्यांना सुरक्षित, निर्भय आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हे पोलिसांचे प्राथमिक कर्तव्य आहे. शाळा-महाविद्यालय परिसरात टवाळखोरी, रोडरोमिओगिरी, छेडछाड किंवा सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तन कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारचे प्रकार आढळल्यास संबंधितांविरुद्ध तत्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. पालक, शिक्षक आणि नागरिकांनीही अशा घटनांची त्वरित माहिती पोलिसांना द्यावी.'

गणेश गुरव,पोलीस निरीक्षक, पिंपळगाव बसवंत

# शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एरंडोलला सलग चौथ्यांदा 'अती उत्तम' मानांकन

**दैनिक युवक आधार**

**एरंडोल प्रतिनिधी** : शास्त्री फाऊंडेशन संचालित शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एरंडोल या संस्थेच्या पदविका फार्मसी अभ्यासक्रमास महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (एमएसबीटीई), मुंबई यांच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या शैक्षणिक संस्था अवेक्षण (Academic Monitoring) अहवालामध्ये सलग चौथ्यांदा "अती उत्तम" असे सर्वोच्च शैक्षणिक मानांकन प्राप्त झाले आहे. संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा, सातत्यपूर्ण प्रगतीचा आणि उत्कृष्ट शैक्षणिक कार्याचा हा आणखी एक महत्त्वपूर्ण गौरव मानला जात आहे.

एमएसबीटीईच्या अहवालानुसार संस्थेत सर्व आवश्यक शैक्षणिक सुविधा निकषांनुसार उपलब्ध असून, अभ्यासक्रमाची प्रभावी व दर्जेदार अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, प्रयोगशाळांची उत्कृष्ट सुविधा, शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धी यांची दखल घेत संस्थेला हा मानाचा दर्जा बहाल करण्यात आला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्राचार्य डॉ. विजय शास्त्री यांनी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. "गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या बळावर संस्था भविष्यातही नवनवीन यश संपादन करेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



संस्थेच्या सचिव सौ. रूपा शास्त्री यांनी या यशाचे श्रेय संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांच्या सामूहिक प्रयत्नांना देत, गुणवत्ता वृद्धीसाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक बाबीवर संस्था सातत्याने कार्यरत राहील, असे सांगितले.

उपप्राचार्य डॉ. पराग कुलकर्णी यांनी संस्थेतील उच्च शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापनातील नावीन्य, संशोधनाभिमुख वातावरण तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमुळे संस्थेला हा प्रतिष्ठेचा दर्जा प्राप्त झाल्याचे सांगितले.

विभागप्रमुख श्री. जावेद शेख यांनी उद्योग-शिक्षण समन्वय अधिक बळकट करण्यासाठी आगामी काळात विविध उपक्रम राबविण्यात येतील व सर्व विभाग त्यासाठी समन्वयाने कार्य करतील, असे नमूद केले.

संस्थेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एरंडोलने गुणवत्तापूर्ण फार्मसी शिक्षणातील आपले अग्रस्थान पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

# पूर्वसूचना धुडकावली, शेतकऱ्याचा जीव गेला; अँड. राकेश पाटील यांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांविरोधात पोलिस तक्रार"

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : अँड. राकेश पाटील व बाळकृष्ण गावंड, प्रमोद सांदनकर यांची रेवदंडा पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक सुजित गडदे यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला"हा अपघात नव्हे, अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला मृत्यू" अलिबाग-रोहा मार्गावरील वेलवली-खानाव हद्दीतील रस्त्यावर पडलेल्या धोकादायक बगदाडाबाबत लेखी पूर्वसूचना देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही उपाययोजना न केल्याने एका निष्पाप शेतकऱ्याला जीव गमवावा लागल्याचा गंभीर आरोप होत आहे. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता तसेच संबंधित ठेकेदार यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १०५ व १०६ अंतर्गत सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड. राकेश नारायण पाटील यांनी रेवदंडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केली आहे. मृत्यूमुखी पडलेले शेतकरी चांगू कमळू



घरत यांचा मृत्यू हा केवळ अपघात नसून प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचा आणि कर्तव्यातील गंभीर कसूरपणाचा परिणाम असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, संबंधित रस्त्यावर मोठे बगदाड पडले असून त्यातून जीवितहानी होण्याची शक्यता असल्याची लेखी तक्रार अँड. राकेश पाटील यांनी दोन दिवस आधीच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली होती. मात्र या इशाऱ्याकडे अधिकाऱ्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. याहून धक्कादायक बाब म्हणजे अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांनीही घटनेच्या दोन दिवस आधी रस्ता तातडीने बंद करून वाहतूक प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात, इशारा फलक लावावेत तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक खबरदारी घ्यावी, अशा स्पष्ट सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. या सूचना पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आल्याचे सांगितले जाते. तरीही कोणतीही कार्यवाही न झाल्याने अखेर एका शेतकऱ्याचा जीव गेला.स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, "अपघात होण्याची वाट पाहत होते का?" असा सवाल उपस्थित केला जात आहे. लाखो रुपयांची कामे करणाऱ्या ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाची कामे केली आणि त्यावर देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांनी डोळेझाक केल्यामुळेच ही शोकांतिका घडल्याचा आरोप होत आहे.अँड. राकेश पाटील यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, जीवितहानीची शक्यता असल्याची स्पष्ट पूर्वसूचना असूनही संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही खबरदारी घेतली नाही. त्यामुळे हा साधा अपघात नसून निष्काळजीपणा, संगनमत आणि कर्तव्यातील कसूर यांचा परिणाम आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील जबाबदार अधिकारी, संबंधित ठेकेदार तसेच तपासात दोषी आढळणाऱ्या इतर व्यक्तींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी.

दरम्यान, या प्रकरणात पोलिस कोणती भूमिका घेतात, तक्रारीची चौकशी कितपत निष्पक्षपणे होते आणि मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला न्याय मिळतो का, याकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गेलेल्या एका जीवाची जबाबदारी निश्चित होणार की पुन्हा एकदा फाईलांच्या ढिगाऱ्यात हे प्रकरण गाडले जाणार, हा खरा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

# जिल्हा परिषद सदस्या माधुरी सागर भिसे यांच्या पाठपुराव्याला यश ; पालखी अनुदानात मोठी वाढ

**दैनिक युवक अधव**

**सणसर : विकास क्षत्रिय** : संत तुकाराम महाराज पालखी सोहळयाच्या पार्श्वभूमीवर बेलवाडी व सणसर गावांसाठी पालखी अनुदानात लक्षणीय वाढ करण्यात आल्याने जिल्हा परिषद सदस्या सौ.माधुरी सागर भिसे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे.

बेलवाडी येथे संत तुकाराम महाराज पालखी सोहळयातील पहिले गोल रिंगण होत असल्याने लाखो वारकरी व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते. रिंगणाच्या आदल्या दिवसापासूनच वारकरी मुक्कामी दाखल होत असल्याने स्वच्छता,तात्पुरती



शौचालये,दिंड्यांसाठी मैदानाची साफसफाई,रिंगण व मंडप व्यवस्था रस्त्यांची स्वच्छता,पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच इतर आवश्यक पायाभूत कामांवर मोठा खर्च करावा लागतो. यासाठी मिळणारे अनुदान अपुरे पडत असल्याची बाब जिल्हा परिषद सदस्या माधुरी भिसे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी,पुणे जिल्हा परिषद यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

त्याअनुषंगाने त्यांनी पालखी अनुदानात वाढ करण्याची लेखी मागणी दि 3 जुलै रोजी केली होती.या मागणीची दखल घेत प्रशासनाने बेलवाडी गावाचे पालखी अनुदान १ लाख रुपयांवरून ५ लाख रुपये,तर सणसर मुक्कामीचे अनुदान ५ लाख रुपयांवरून १० लाख रुपये मंजूर केले आहे.तसेच भविष्यात पालखी मुक्कामी गावांना अधिक सक्षम आर्थिक मदत देण्याचीही मागणी त्यांनी केली आहे.अनुदान वाढीमुळे पालखी सोहळयादरम्यान वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा अधिक दर्जेदार पद्धतीने उपलब्ध करून देणे शक्य होणार असून स्वच्छता, आरोग्य व मूलभूत सुविधा बळकट होण्यास मदत होईल.या निर्णयामुळे वारकरी, ग्रामस्थ आणि पालखी सोहळयाशी संबंधित विविध समित्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.याबाबत बोलताना जिल्हा परिषद सदस्या सौ. माधुरी सागर भिसे यांनी,"वारकरी संप्रदायाची सेवा हीच खरी सेवा असून पालखी सोहळयासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा हा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.यापुढेही पालखी मार्गावरील गावांच्या विकासासाठी पाठपुरावा सुरू राहील,"असे सांगितले.

# सरपंचांच्या अटकेने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न सुटणार का? नागरिकांचा सवाल

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने** : छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील गेवराई पायगा येथील सरपंच मंगेश साबळे यांना अटक झाल्यानंतरही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न कायम असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. जिल्हा परिषद शिक्षकांवर वाढलेल्या अशैक्षणिक कामांच्या विरोधात शिक्षक संघटनांनी आवाज उठवला होता. यानंतर झालेल्या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रातील



मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची टीका होत आहे

शिक्षकांचे म्हणणे आहे की, त्यांच्यावर विविध अशैक्षणिक जबाबदाऱ्या टाकल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत आहे. त्यामुळे अशा कामांमधून शिक्षकांना

**शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा भार कमी करून शिक्षण व्यवस्थेकडे लक्ष देण्याची मागणी**

मुक्त करून शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, सरपंचांवरील कारवाईमुळे शिक्षण व्यवस्थेतील मूलभूत समस्या सुटतील का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत असून प्रशासनाने या प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे

# जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा निल्लोडच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी उमेश आहेर

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, निल्लोड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शालेय व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले. यामध्ये अध्यक्षपदी उमेश पंढरीनाथ आहेर तर उपाध्यक्षपदी नंदा पंढरीनाथ सांगळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी समितीचे सदस्य म्हणून सोनाली शेवाळे, संगीता जाधव, रमेश आहेर, दत्तात्रय पवार, सुमया भगवान, सर्जेराव फलके, सीमा गोराडे आणि



उषा मगर यांची निवड करण्यात आली.

निवड प्रक्रिया केंद्रीय मुख्याध्यापक सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शांततेत व पारदर्शकपणे पार पडली. या प्रसंगी सरपंच उत्तमराव शिंदे, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

नवनिर्वाचित अध्यक्ष उमेश आहेर व उपाध्यक्ष नंदा सांगळे यांचा उपस्थित मान्यवरांनी सत्कार करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. पंचायत समितीचे उपसभापती भगवान पाटील आहेर, योगेश रोडे, नंदकिशोर आहेर आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# ७/११ मुंबई लोकल बॉम्बस्फोटातील शहीदांना भावपूर्ण श्रद्धांजली; विविध पश्चिम रेल्वे स्थानकांवर श्रद्धांजली सभा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब.मिरा -भाईंदर, ठाणे** : ११ जुलै २००६ रोजी मुंबईच्या पश्चिम रेल्वे मार्गावरील उपनगरी लोकल गाड्यांमध्ये झालेल्या भीषण साखळी बॉम्बस्फोटांच्या घटनेला आज १९ वर्षे पूर्ण झाली. या अमानुष दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या निष्पाप प्रवाशांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी पश्चिम रेल्वेच्या विविध स्थानकांवर आज भावपूर्ण श्रद्धांजली सभांचे आयोजन करण्यात आले. चर्चगेट, मुंबई सेंट्रल, दादर, बांद्रा, अंधेरी, बोरिवली यांसह अनेक स्थानकांवर रेल्वे प्रशासन, कर्मचारी, प्रवासी संघटना, सामाजिक संस्था, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून मृतांना आदरांजली वाहिली आणि पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना अभिवादन केले.

या प्रसंगी वातावरण अत्यंत गंभीर आणि भावनिक होते. अनेक प्रवाशांच्या डोळ्यांत त्या काळातील भीषण आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. ११ जुलै २००६ रोजी अवघ्या ११ मिनिटांच्या अंतरात पश्चिम रेल्वे मार्गावरील सात लोकल गाड्यांमध्ये झालेल्या स्फोटांनी संपूर्ण मुंबई शहर हादरून गेले होते. संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी झालेल्या या हल्ल्यात शेकडो निष्पाप प्रवाशांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. मुंबईच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या लोकल सेवेवर झालेला हा हल्ला केवळ शहरावरच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या मनावर खोल जखम करून गेला.

श्रद्धांजली सभांमध्ये बोलताना रेल्वे अधिकारी आणि मान्यवरांनी त्या दिवसाची भीषणता, बचावकार्याची तातडी आणि त्यानंतर मुंबईकरांनी दाखवलेली एकजूट यांचे स्मरण केले. संकटाच्या त्या कठीण क्षणी रेल्वे कर्मचारी, पोलीस, अग्निशमन दल, डॉक्टर, रुग्णवाहिका कर्मचारी, स्वयंसेवक आणि सामान्य नागरिकांनी जीवाची पर्वा न करता मदतकार्य केले, याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अनेकांनी जखमींना रुग्णालयात पोहोचवण्यासाठी केलेल्या धावपळीची, रक्तदान शिबिरांची आणि शहरभर उभ्या राहिलेल्या मदतीच्या हातांची आठवण करून दिली. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी दहशतवादा विरोधात एकजूट राहण्याची शपथ घेतली आणि शहीदांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन केले. "७/११" हा दिवस केवळ दुःखद आठवण नसून देशाच्या ऐक्याचा, जिद्दीचा आणि दहशतवादा विरोधातील सामूहिक लढ्याचा संदेश देणारा दिवस असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# वेश्या व्यवसायातून दोन बांगलादेशी महिलांसह सहा महिलांची सुटका

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** ; पनवेल शहरातील हॉटेल राहुल पार्क लॉजिंग अँड बोर्डिंग वर छापा टाकून पोलिसांनी दोन बांगलादेशी महिलांसह सहा पीडित महिलांची सुटका केली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम यांना




हॉटेल राहुल पार्क लॉजिंग अँड बोर्डिंग येथे मॅनेजर लॉजमध्ये महिला ठेवून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करून घेतो अशी माहिती मिळाली. त्यानुसार त्या ठिकाणी बनावट ग्राहकाला पाठवले. त्याच्या सांकेतिक इशारावरून पोलिसांच्या पथकाने लॉजवर छापा टाकला. यावेळी छाप्यामध्ये दोन बांगलादेशी महिलांसहित सहा पिडीत महिला वेश्यागमन करण्यासाठी ठेवलेल्या मिळून आल्या. लॉज मॅनेजर गामा नंदू सोनकर, कॅशियर दिपू उमेश यादव, वेटर प्रियांशू रविदास यादव, आणि पाहिजे आरोपी रमेश शर्मा लॉज मालक यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात दहा जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींना 13 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# दुर्घटनेची वाट न पाहता कारवाई करा; जीर्ण शाळा इमारत पाडण्याची जोरदार मागणी

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड (मोहदरी)** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोहदरी येथील निर्जीव व अत्यंत जीर्ण झालेल्या शाळेच्या इमारतीमुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. इमारतीच्या भिंतींना मोठमोठे तडे गेले असून काही भाग कोसळण्यास सुरुवात झाल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या पालक सभेत सर्व पालकांनी एकमताने ठराव मंजूर करून संबंधित धोकादायक व निर्जीव इमारत तात्काळ पाडण्यात यावी तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना त्वरित करण्यात यावी, अशी मागणी केली.पालकांनी सांगितले की, शाळेच्या परिसरात विद्यार्थी दररोज ये-जा करत असल्याने कोणतीही दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने कोणतीही जीवितहानी होण्यापूर्वी तातडीने कारवाई करून धोकादायक इमारत हटवावी व नवीन शाळा इमारतीच्या उभारणीसाठी आवश्यक प्रक्रिया सुरू करावी.यावेळी पालकांनी शिक्षण विभाग, पंचायत समिती व जिल्हा परिषद प्रशासनाकडे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली आहे. पालक सभेत हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.



# विवेक वर्धिनी प्राथमिक विद्यालयाचा 'एमटीएस' परीक्षेत डंका; सहा विद्यार्थी राज्यात चमकले!

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र टॅलेंट सर्च (MTS) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये देवणी येथील विवेक वर्धिनी प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत राज्यस्तरावर दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या परीक्षेत शाळेतील एकूण सहा विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत (Merit List) मानाचे स्थान मिळवून शाळेच्या व देवणी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

शाळेतील वेगवेगळ्या इयत्तेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश अत्यंत कौतुकास्पद आहे . राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत क्रमांक मिळवलेले

इयत्ता तिसरी महाजन आरोही गणेश – राज्यात १५ वा क्रमांक कंचे अंश गणेश – राज्यात १७ वा क्रमांक

इयत्ता चौथी डोंगरे शिवम शिवकांत – राज्यात २५ वा क्रमांक

शेख आलिया अतीकमिया – राज्यात ३३ वा क्रमांक इयत्ता दुसरी

शेख अलीना शादुल – राज्यात २९ वा क्रमांक चव्हाण अधिरा हरिदास – राज्यात ३७ वा क्रमांक गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार



विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या अभूतपूर्व यशाबद्दल शाळेच्या वतीने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती (देवणी) चे सभापती श्री. सदाशिवराव रामचंद्रराव पाटील आणि विवेक वर्धिनी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पाटील विनायक सदाशिवराव यांच्या शुभहस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

"ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय परीक्षेत मिळवलेले हे यश कौतुकास्पद असून, यामुळे शाळेचा दर्जा आणि शिक्षकांची मेहनत दिसून येते. यावेळी शिक्षक वृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# सिल्लोड येथे १३ जुलैला अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी भव्य महामोर्चा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील संभाव्य उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) रद्द करण्यासाठी व संविधानाने दिलेल्या सामाजिक न्याय, समता आणि अनुसूचित जातींच्या विद्यमान आरक्षणाच्या संरक्षणासाठी, उद्या सोमवार, दिनांक १३ जुलै २०२६ रोजी सिल्लोड येथे 'अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी भव्य महामोर्चा' आयोजित करण्यात आला आहे. या महामोर्चाच्या तयारीबाबत नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली.

यावेळी आयोजकांनी सांगितले की, १ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाने, राज्य सरकारांना विशिष्ट परिस्थितीत अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याची मुभा असू



शकते, असा निकाल दिला होता. मात्र, अनुसूचित जातींमधील एकजूट तोडण्याच्या हेतूने, कोणत्याही मागणीशिवाय उपवर्गीकरण करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. असे उपवर्गीकरण करताना राज्याने ठोस, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यावर आधारित आकडेवारी सादर करणे आवश्यक आहे. तसेच, उपवर्गीकरण मनमानी पद्धतीने किंवा कोणत्याही समाजघटकावर अन्याय होईल अशा प्रकारे करता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सरकारच्या या कुटील डावाला विरोध करण्यासाठी राज्यभर उपवर्गीकरण विरोधात मोर्चे काढले जात असून, त्याचाच एक भाग म्हणून सिल्लोडमध्ये १३ जुलैला 'जन आक्रोश महामोर्चा' काढण्यात येणार आहे.

महामोर्चा आयोजकांच्या मते, जर अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण लागू झाले, तर त्याचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. पंजाब आणि आंध्र प्रदेशमध्ये असे प्रयोग झाल्याने, तिथली जनता आता उपवर्गीकरणाला विरोध करत आहे, कारण अनुसूचित जातींच्या न भरल्या जागा खुल्या प्रवर्गात वर्ग करण्यात आल्या होत्या. सध्या कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमध्ये उपवर्गीकरणावर स्थगिती आहे. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये सामाजिक फूट आणि परस्पर मतभेद वाढण्याची शक्यता असून, संविधानाने दिलेल्या समान प्रतिनिधित्वाच्या संकल्पनेवर याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती आयोजकांनी व्यक्त केली.

यावेळी पत्रकार परिषदेस प्राचार्य सुनील वाकेकर, श्रावणदादा गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष संजय आरके, के. आर. डुबे, डॉ. प्रकाश बिरारे, के. के. जगताप, प्रभाकर पारधे, अमित आरके, नगरसेवक जितू आरके, विनोद पगारे, अशोक सोनवणे, वाय. आर. साळवे, अशोक सुरडकर, प्रा. विजय वाकेकर, अरुण कोतकर, बारकू आरके, राजेश्वर आरके, राजू जमधडे, मनोहर आरके, धम्मा दांडगे, अशोक आरके, प्रभाकर सुरडकर, अभय वाकेकर, प्रल्हाद पगारे, रोहन शेजुळ, शेख सोहिल, नाना सुरडकर, देविदास सुरडकर, धम्मा दांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# सिद्धार्थ विद्यालयात किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य व जनजागृती मार्गदर्शन कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा :** सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, सावरी/मुरमाडी येथे किशोरवयीन मुलींच्या शारीरिक, मानसिक आणि वैयक्तिक आरोग्याविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या कु. वासनिक मॅडम उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना किशोरवयात होणाऱ्या शारीरिक व मानसिक



बदलांना सकारात्मक दृष्टीकोनातून सामोरे जाण्याचे आवाहन केले. तसेच आरोग्याबाबत जागरूक राहून स्वच्छता, योग्य आहार आणि आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले.यावेळी आरोग्य कर्मचारी श्री. डोंगरे, कातोरे मॅडम, रामटेके मॅडम तसेच आशासेविका चाचेरे मॅडम यांनी किशोरवयीन मुलींचे आरोग्य, मासिक पाळीतील स्वच्छता, पोषण, रक्तक्षय प्रतिबंध, वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्यदायी जीवनशैली याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनीही विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.या कार्यक्रमाला विद्यालयातील कु. साठवणे मॅडम, सुखदेवे मॅडम आणि स्मिता आगाशे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. उपस्थितांनी अशा उपक्रमांचे नियमित आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# मिरा–भाईंदरकरांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आमदार नरेंद्र मेहता यांचा 'जनता दरबार' १३ जुलै रोजी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब.मिरा - भाईंदर, ठाणे :** मिरा-भाईंदरमधील नागरिकांच्या विविध समस्या, तक्रारी, सूचना आणि अपेक्षा थेट जाणून घेण्यासाठी आमदार नरेंद्र मेहता यांच्या पुढाकाराने 'जनता दरबार' आयोजित करण्यात आला आहे. हा जनता दरबार सोमवार, १३ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मिरा रोड येथील भाजपा जिल्हा कार्यालय, अनंता हॉटेलसमोर, दीपक हॉस्पिटल रोड येथे पार पडणार आहे.

या उपक्रमाद्वारे नागरिकांना त्यांच्या परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, वीज, सरकारी योजना तसेच इतर नागरी समस्यांबाबत थेट आमदारांसमोर मांडणी करण्याची संधी मिळणार आहे. प्राप्त झालेल्या तक्रारींवर संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधून तातडीने कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

मिरा-भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या आणि वाढत्या नागरी समस्यांच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी अशा प्रकारचे जनता दरबार महत्त्वाचे ठरत असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

आमदार नरेंद्र मेहता यांनी सर्व नागरिकांना या जनता दरबारात उपस्थित राहून आपल्या अडचणी, सूचना आणि विकासासंदर्भातील अपेक्षा मोकळेपणाने मांडण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांचा थेट सहभाग आणि लोकप्रतिनिधींची तत्परता यामुळे अनेक प्रलंबित प्रश्नांना मार्ग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# रेलगाव शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; सहा जणांवर गुन्हा, ९२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर :** सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी रेलगाव शिवारातील पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर शुक्रवारी दुपारी २ वाजता धाड टाकून सहा जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

छाप्यामध्ये आरोपी पत्त्यावर पैसे लावून 'झन्नामन्ना' नावाचा जुगार खेळत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून ७ हजार ७८० रुपयांची रोख रक्कम, हिरो एचएफ डिलक्स व बजाज प्लेटिना या दोन दुचाकी, तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ९२ हजार ७८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी धन्नूसिंग भीमसिंग मांडपे, वामन सांडू काजळे, भिकूसिंग विठूसिंग सिमरे, कमलसिंग फुलसिंग ढगे, विष्णू कौतिक काजळे, समाधान धनसिंग चव्हाण सर्व रा. रेलगाव ता. सिल्लोड यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार विजय धुमाळ यांच्या फिर्यादीवरून कारवाई करण्यात आली. पुढील तपास सिल्लोड ग्रामीण पोलीस करीत आहेत.

# जिल्हाधिकारी वर्षा मीना रविवारी अकोला आकाशवाणीवर !! मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी :** मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदाराचा सहभाग – लोकशाहीची ताकद" या विषयावर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा मीना यांची विशेष मुलाखत रविवार १२ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता आकाशवाणी अकोला केंद्रावरून प्रसारित करण्यात येणार आहे.

आकाशवाणी अकोला केंद्राचे प्रसारण अधिकारी सूरज गोळे यांनी ही मुलाखत घेतली असून, त्यामध्ये मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे उद्दिष्ट, मतदार




नोंदणी, नावातील दुरुस्ती, नवमतदारांची नोंदणी, नागरिकांची भूमिका तसेच लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराच्या सहभागाचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे.ही मुलाखत आकाशवाणी अकोला केंद्राच्या एफएम १०२.४ मेगाहर्ट्झवर तसेच न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवरही ऐकता येणार आहे.

यावेळी अभियांत्रिकी प्रमुख मोहनसिंग राजपूत,प्रसारण अधिकारी विनोद गवळी ग्रंथालय सहायक प्रकाश वैद्य आदी उपस्थित होते.मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सर्व पात्र नागरिकांनी सक्रिय सहभाग घेऊन आपली मतदार नोंदणी, आवश्यक दुरुस्ती व पडताळणी वेळेत पूर्ण करावी सविस्तर माहितीबाबत नागरिकांनी ही मुलाखत ऐकावी असे आवाहन निवडणूक उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर यांनी केले आहे.

# स्मार्टफोन' चे मायाजाल आणि अंधारात चाललेले भविष्य...!

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे, यात शंका नाही. परंतु, विज्ञानाचा हाच चमत्कार जेव्हा लहान मुलांच्या हातात विनाअशर्त सुपूर्द केला जातो, तेव्हा तो वरदान ठरण्याऐवजी एक भयानक शाप बनू लागतो. '१८ वर्षांखालील पाल्यांना स्मार्टफोनच्या वापरावर शासनाने कायदेशीर बंदी घालावी,' ही आज समाजातून पुढे येणारी मागणी वर वर पाहता टोकाची वाटू शकते. परंतु, सध्याच्या परिस्थितीचे गांभीर्य पाहिले तर हा केवळ एका व्यक्तीचा उद्वेग नाही, तर संपूर्ण देशाच्या भविष्याची चिंता वाहणारा एक धोक्याचा इशारा आहे. आजकालची लहान मुले आणि तरुण पिढी इंटरनेटच्या ज्या अथांग मायाजालात अडकत चालली आहे, त्यातून त्यांना बाहेर काढले नाही, तर आपल्या देशाचे भविष्य एका मोठ्या अंधार कोठडीत ढकलले जाईल, यात तिळमात्र शंका नाही. गेल्या काही वर्षांत गुन्हेगारीच्या आलेखात झालेली वाढ आणि त्यात अल्पवयीन मुलांचा असलेला सहभाग थक्क करणारा आहे. या वाढत्या गुन्हेगारीच्या मुळाशी डोकावून पाहिले, तर तिथे 'स्मार्टफोन' आणि 'अनिर्बंध इंटरनेट' हेच मुख्य खलनायक म्हणून समोर येतात. ज्या वयात मुलांच्या हातात मैदानावरील खेळणी, पुस्तके किंवा सुसंस्कार असायला हवेत, त्या वयात त्यांच्या हातात स्क्रीन आली आहे. या स्क्रीनवर काय पाहावे आणि काय पाहू नये, याचे कोणतेही भान नसलेले वय या आभासी जगाच्या आहारी जात आहे. हिंसक गेम्स, अश्लील साहित्य आणि सायबर गुन्हेगारांचे जाळे यात ही कोवळी मने अडकत आहेत. ही केवळ पिढी बरबाद होण्याची सुरुवात नसून, एका



संपूर्ण सुसंस्कृत समाजाचा पाया ढासळत असल्याचे लक्षण आहे.

"तंत्रज्ञानाचा अनिर्बंध वापर हा मानवी मूल्यांचा संकोच करत आहे. जेव्हा लहान मुलांचे संगोपन आई-वडिलांऐवजी 'अल्गोरिदम' करू लागते, तेव्हा समाज विनाशाकडे वाटचाल करतो."यात आणखी एक गंभीर भर पडली आहे ती 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बेसुमार आणि अनियंत्रित वापराची AI चा वापर विधायक कामांसाठी होण्याऐवजी, आजच्या तरुणाईकडून त्याचा गैरवापर झपाट्याने होत आहे. 'डीपफेक' सारख्या तंत्रज्ञानामुळे कुणाचेही वैयक्तिक आयुष्य एका मिनिटात उद्ध्वस्त केले जाऊ शकते. आज या डिजिटल जगात 'वैयक्तिक' किंवा 'खाजगी' (Privacy) असं काही उरलेलंच नाही. आपण सोशल मीडियावर अपलोड केलेले साधे फोटो ही कधीच पूर्णपणे नष्ट होत नाहीत, हे एक भयंकर वास्तव आहे. बलाढ्य टेक कंपन्या आपल्या नकळत आपल्या डेटाचा, फोटोंचा आणि माहितीचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी आणि आपल्याला डिजिटल गुलाम बनवण्यासाठी करत आहेत. एका बाजूला डेटा चोरीचे साम्राज्य आणि दुसऱ्या बाजूला संस्कारहीन होणारी पिढी, अशा दुहेरी चक्रव्यूहात आपला देश अडकला आहे. मुले ही देशाचे भविष्य असतात, असे आपण अभिमानाने सांगतो. परंतु, हेच भविष्य जर डोळ्यांवर डिजिटल पट्टी बांधून अंधाऱ्या दरीकडे वाटचाल करत असेल, तर शासनाने केवळ मूकदर्शक बनून चालणार नाही. तंबाखू, सिगारेट किंवा मद्यपानावर जशी वयाची बंधने असतात, तशीच किंबहुना त्याहूनही कडक बंधने स्मार्टफोनच्या वापरावर आणण्याची वेळ आता आली आहे. डिजिटल साक्षरता आणि कायदेशीर निर्बंध या दोन्ही स्तरांवर शासनाला कठोर पावले उचलावीच लागतील. केवळ कायदे करून चालणार नाही, तर पालकांनीही आपली जबाबदारी ओळखून 'सोयीस्कर पालकत्व' (Convenient Parenting) सोडून दिले पाहिजे. मुलांचा हट्ट पुरवण्यासाठी किंवा त्यांना शांत ठेवण्यासाठी त्यांच्या हातात मोबाईल देणे म्हणजे त्यांच्या हातात विष देण्यासारखे आहे. हा प्रश्न केवळ एका कुटुंबाचा नाही, तर देशाच्या सार्वभौमत्वाचा आणि सुरक्षिततेचा आहे. वेळीच जागे झालो नाही, तर तंत्रज्ञानाच्या या अथांग मायाजालात देशाचे उज्ज्वल भविष्य कायमचे लुप्त होऊन जाईल. शासनाने आता तरी डोळे उघडावे आणि यावर ठोस पावले उचलावीत, हीच काळाची गरज आहे..!

---लेखक---

**डॉ.सुशिल तांबे सर**
**प्रशिक्षक टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र, तथा सचिव बीड जिल्हा टेनिस क्रिकेट.**

# पावसाचा थेंब थेंब मोजताना; विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड

‘पाऊसपाणी’ तील पहिला शब्द म्हणजे आपल्या गावात पाऊस कसा पडला, किती पडला अशा अर्थाने आणि पुढचा पाणी हा शब्द पडलेला पाऊस साठवला का? मुरवला का? या अर्थाने.. आता या पाऊस पाण्याच्या निमित्ताने आपण पाऊस मोजण्याच्या जगात फेरफटका मारूया म्हणजे किती पाऊस पडला, हे आपल्याला कळेल आणि वॉटर बजेटमध्ये त्याचा उपयोग होईल. पाऊस किती पडला, हे नक्की कसे मोजतात? हा अंदाज नाही, हे एक अचूक शास्त्र आहे.

पावसाचे मोजमाप म्हणजे काय?

पाऊस मिलिमीटरमध्ये मोजला जातो. ‘आज २५ मिमी पाऊस पडला’ म्हणजे काय? याचा सरळ अर्थ असा : जमिनीवरून पाणी कुठेही वाहून गेले नाही, मुरले नाही आणि त्याचे बाष्पीभवन झाले नाही, तर त्या जमिनीवर २५ मिलिमीटर उंचीचा पाण्याचा थर साचेल. म्हणजे पाऊस ही एका सपाट पृष्ठभागावर साचणाऱ्या पाण्याच्या उंचीची मोजणी आहे. या पावसाच्या मापनाची विविध साधने आणि पद्धती कोणत्या आहेत, हीपण एक रंजक गोष्ट आहे.

१. साधा पर्जन्यमापक

सर्वात जुनी आणि सोपी पद्धत. एक उघडे भांडे ठेवायचे. त्यात साठलेले पाणी मोजपट्टीने मोजायचे. भारतीय हवामान विभाग (IMD) ‘सिमन्स गेज’ वापरतो. यात वरचा फनेलचा भाग पाणी गोळा करतो आणि खालच्या बाटलीत साठतो. दिवसातून एकदा किंवा दोनदा हे पाणी मोजपट्टीने मोजले जाते.

२. टिपिंग बकेट रेन गेज

यात दोन छोट्या बकेट (वाटी) असतात, ज्या एका तराजूवर तोलून ठेवलेल्या असतात. एक बकेट भरली की ती झुकते, पाणी सांडते आणि दुसरी बकेट त्या जागी येते. प्रत्येक झुकण्याची गणना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होते. त्यामुळे हे स्वयंचलित आहे आणि सतत डेटा देत राहते.

३. वेटिंग प्रिसिपिटेशन गेज

यात पाणी मोजण्याऐवजी वजन मोजले जाते. पाऊस किंवा बर्फ साठलेल्या भांड्याचे वजन सतत मोजले जाते आणि त्यावरून पावसाचे प्रमाण कळते. बर्फ पडणाऱ्या भागांत ही पद्धत उपयुक्त आहे.

४. रडार आणि उपग्रह तंत्रज्ञान

आधुनिक हवामान विभाग डॉप्लर रडार वापरतो. हे रडार ढगांमधील पाण्याचे थेंब आणि बर्फाचे कण ओळखून संपूर्ण प्रदेशावरील पावसाचा अंदाज देते. एका जागी न जाता! ISRO चे INSAT आणि इतर हवामान उपग्रह संपूर्ण देशावरील ढगांची हालचाल टिपतात. आता आपण पाऊस मोजण्याच्या जगातील वेगवेगळ्या पद्धतींच्या जगात फेरफटका मारूयात.

एका छोट्या भांड्यापासून अवकाशातील उपग्रहांपर्यंत

पाऊस मोजणे ही फक्त भारतापुरती गोष्ट नाही. हे जागतिक शास्त्र आहे आणि प्रत्येक देशाने आपल्या भूगोलाला अनुसरून वेगळी तंत्रे विकसित केली आहेत. एक रंजक गोष्ट सांगतो, कोरियामध्ये जोसेऑन काळात ‘च्युगुगी’ (Cheugugi) नावाचे लोहाचे एक उपकरण वापरले जात होते, जे आजच्या पर्जन्यमापकांसारखेच काम करायचे. तब्बल ३२ सेंटिमीटर खोल आणि ठरावीक व्यासाचे हे उपकरण पाऊस मोजण्यासाठी वापरले जायचे. म्हणजे शेकडो वर्षांपूर्वीच मानवाने या शास्त्राचा पाया घातला होता.

डूयुअल पोलरायझेशन



रेडार : पावसाचा अचूक अंदाज

विकसित देशांत आता पारंपरिक रेडारपेक्षा अधिक प्रगत तंत्रज्ञान वापरले जाते. ड्युअल पोलरायझेशन रेडार गेल्या काही दशकांत सिंगल पोलरायझेशनवरून ड्युअल पोलरायझेशनकडे झालेल्या स्थलांतरामुळे रडार तंत्रज्ञानात मोठी प्रगती झाली आहे, ज्यामुळे अडथळे दूर करणे आणि पावसाच्या अंदाजाची अचूकता लक्षणीयरीत्या सुधारली आहे. या तंत्रामुळे पावसाचे थेंब आणि बर्फाचे कण यांच्यात फरक ओळखता येतो. साधा रेडार हे करू शकत नाही. या प्रगतीमुळेच आता शहरी भागांत पुराचा अंदाज घेण्यासाठी लहान, स्वस्त आणि उच्च रिझोल्यूशन असलेले X-बँड पोलरायमेट्रिक रडार विकसित झाले आहेत . अमेरिकेत तर असे १६० हून अधिक रडार स्टेशन्सचे जाळे (NEXRAD नेटवर्क) देशभर पसरलेले आहे.

अवकाशातून पाऊस मोजणे उपग्रहांची किमया

ही सर्वात आश्चर्यकारक गोष्ट आहे. आता पाऊस अवकाशातूनही मोजला जातो. NASA आणि जपानच्या JAXA या संस्थांनी मिळून तयार केलेली GPM (Global Precipitation Measurement) मोहीम जगभरातील पाऊस आणि बर्फाचे निरीक्षण करणाऱ्या उपग्रहांचे आंतरराष्ट्रीय जाळे आहे. यातील मुख्य उपग्रहावर बसवलेला ड्युअल फ्रिक्वेन्सी रडार पावसाचे आणि बर्फाच्या थेंब कणांचे त्रिमितीय (3D) मापन करतो. या उपग्रहाची खासियत म्हणजे तो जमिनीपासून सुमारे २० किलोमीटर उंचीपर्यंत पाऊस आणि बर्फाचे उभे प्रोफाईल देऊ शकतो आणि अगदी तासी ०.७ मिलिमीटर इतका हलकाही पाऊस ओळखू शकतो इतकी प्रगत तंत्रज्ञानाची किमया!

IoT आणि सेन्सर नेटवर्क : भविष्यातील दिशा

आता जगात एक नवीन ट्रेंड सुरू झाला आहे. Internet of Things (IoT) आधारित सेन्सर नेटवर्क. इटलीतील जेनोवा शहरात झालेल्या एका प्रयोगात पारंपरिक रडार आणि पर्जन्यमापक न पोहोचणाऱ्या धोकादायक भागांतही कमी संख्येच्या सेन्सर्सने पाऊस मोजता येतो. हे तंत्रज्ञान विशेषतः दुर्गम आणि डोंगराळ भागांसाठी उपयुक्त ठरत आहे, जिथे मोठे रेडार बसवणे अवघड असते.

विकसित देश आणि भारत यांतील फरक

विकसित देश रडार नेटवर्क, उपग्रह आणि AI यांचा एकत्रित वापर करून जवळजवळ प्रत्येक चौरस किलोमीटरचा पावसाचा डेटा मिळवतात. भारतात असे जाळे अजूनही विस्तारत आहे; पण ISRO आणि IMD यांनी मिळून केलेली प्रगती कौतुकास्पद आहे.

फरक एवढाच आहे की, विकसित देश या संदर्भातील बारीक तपशील मोजण्यावर भर देतात, तर विकसित होत असलेले देश आधी ‘संपूर्ण भौगोलिक कव्हरेज’ मिळवण्यावर भर देतात. कुणीतरी विचारेल आता ही झाली तंत्रज्ञानांची दुनियादारी; पण मी माझ्या घरी पाऊस मोजू शकतो का?

हो, नक्कीच! आणि हे करणे खूप सोपे आणि मजेशीर आहे.

पाऊस मोजण्यासाठी लागणारी साधने

- एक सरळ बाजूंचा पारदर्शक डबा किंवा बाटली (वरचा आणि खालचा भाग समान रुंदीचा असावा)

- मिलिमीटर मापपट्टी (स्केल)

- समतल आणि उघडी जागा (झाडाखाली किंवा भिंतीजवळ नको)

सोपी पद्धत:

१. डबा जमिनीपासून थोड्या उंचीवर (स्टँडवर) ठेवा, जेणेकरून आसपासच्या पाण्याचे शिंतोडे त्यात जमा होणार नाहीत

२. पाऊस थांबल्यावर किंवा ठरावीक वेळी (उदा. सकाळी ८ वाजता) डब्यातील पाण्याची उंची मोजा

३. ही उंची मिलिमीटरमध्ये नोंदवा. हाच तुमचा पाऊस

४. मोजल्यानंतर डबा रिकामा करा, पुढच्या मोजणीसाठी तयार ठेवा

आजकाल बाजारात स्वस्त घरगुती रेन गेज सहज मिळतात. काही ऑनलाईन शॉपिंग साईटवर उपलब्ध आहेत. आपापल्या गावातील पाऊस मोजण्याचे तंत्र आपण शिकून घेतले पाहिजे, तरच वॉटर बजेट करून पाण्याचा संयमित जबाबदारीने वापर करू शकू.

**मंगेश कश्यप**

# यंदाच्या पावसाळ्यात पाणी उकळून, गाळून पिणे का आवश्यक झाले आहे?

‘गेल्या काही दिवसांपासून पुणे शहर आणि परिसरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला असून, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांमध्येही गढूळपणा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून आणि गार करूनच प्यावे आणि शक्य असल्यास कोमट पाण्याचा वापर करावा,’ असा सल्ला आरोग्य तज्ज्ञांनी दिला आहे. दरम्यान, साथरोगांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पुणे महापालिकेनेही विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे नियोजन केले आहे.



दर वर्षी पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे विषमज्वर, कावीळ, कॉलरा, अतिसार, उलट्या, मळमळ आणि विविध पोटांचे विकार मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. पावसामुळे पाण्याच्या स्रोतांमध्ये गाळ, सांडपाणी किंवा इतर अशुद्ध घटक मिसळण्याची शक्यता वाढते. अनेकदा पाण्यावर प्रक्रिया केली जात असली, तरी काही घातक जीवाणू पूर्ण नष्ट होत नाहीत. त्यामुळे पाणी किमान काही मिनिटे उकळून त्यानंतरच पिणे अधिक सुरक्षित ठरते, असे आरोग्यतज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे घशाचे संसर्ग, सर्दी आणि पचनाशी संबंधित त्रासही कमी होण्यास मदत होते.

**महापालिकेची तयारी**

पावसाळ्यात डासांमुळे पसरणाऱ्या आजारांचाही धोका वाढत असल्याने पुणे महापालिकेने पूर्वतयारी सुरू केली आहे. संवेदनशील भागांची ओळख करून तेथे औषधफवारणी, आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून तापरुग्णांचा शोध, साथरोगांचे सर्वेक्षण, विविध विभागांमध्ये समन्वय, कीटकनाशकांचा पुरेसा साठा, वृद्धाश्रम व निवासी संस्थांमध्ये विशेष तपासणी तसेच डासांच्या उत्पत्तीस्थळांवर नियंत्रणासाठी एकात्मिक कीटक व्यवस्थापन राबविण्यात येणार आहे.

**पावसाळ्यात काळजी आवश्यक**

■ पाणी उकळून आणि गार करून प्या.

■ पिण्याच्या पाण्याच्या नळाला स्वच्छ फडके बांधा.

■ उघड्यावर ठेवलेले पाणी किंवा दूषित पाणी पिणे टाळा.

■ उलट्या, जुलाब, ताप किंवा कावीळची लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# फक्त हिरवी नाही, आता जांभळी भेंडीही खा! वजन आणि पचनासाठी ठरेल ‘सुपरफूड’

तुम्ही कधी जांभळी भेंडी खाल्ली आहे का? या भेंडीला ‘मॅजेंटा भेंडी’ असेही म्हणतात. ही तिच्या हिरव्या भेंटी इतकी सामान्य नाही, पण आरोग्यासाठी तितकीच फायदेशीर आहे. त्यामुळे, जर तुम्हाला ती मिळाली, तर तिचे नक्की सेवन करा कारण तिचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. या भाजीबद्दल अधिक माहिती देताना, क्लिनिकल डायटिशियन गरिमा गोयल यांनी सांगितले की, “जांभळी भेंडी ही नेहमीच्या हिरव्या भेंडीचा एक आकर्षक प्रकार आहे. तिचा लक्षवेधी जांभळा रंग ‘अँथोसायनिन्स’मुळे येतो. ही नैसर्गिक रंगद्रव्ये बेरी, लाल कोबी आणि जांभळ्या गाजरांमध्येही आढळतात आणि ती त्यांच्या अँटिऑक्सिडंट व दाह-विरोधी (anti-inflammatory) गुणधर्मांसाठी ओळखली जातात.”



गोयल पुढे म्हणाल्या की, ही संयुगे पेशींना ऑक्सिडेटिव्ह ताणापासून वाचवण्यास, हृदयाच्या आरोग्यास मदत करण्यास आणि चयापचय (metabolism) संतुलन सुधारण्यास हातभार लावू शकतात. त्यांनी असेही सांगितले की, पौष्टिकतेच्या बाबतीत जांभळी आणि हिरवी भेंडी बऱ्यापैकी सारख्याच आहेत — “दोन्हीमध्ये फायबर, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फोलेट आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते, परंतु जांभळ्या प्रकारात तिच्या रंगद्रव्यामुळे अँटिऑक्सिडंट्सचा अतिरिक्त फायदा मिळतो.”

**जांभळी भेंडी आकर्षक का वाटते?**

गोयल म्हणाल्या, “यामुळे नेहमीच्या भेंडीचे सर्व फायदे मिळतातच, शिवाय रोजच्या जेवणाला एक रंगीबेरंगी आणि अँटिऑक्सिडंट्सनी समृद्ध असा वेगळा स्वादही मिळतो.”

“भेंडीमधील फायबर आतड्यांचे आरोग्य आणि पचनक्रिया सुधारते, रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करते आणि पोट भरल्याची भावना निर्माण करते. त्यामुळे जे लोक वजन नियंत्रण किंवा संतुलित पोषणावर लक्ष केंद्रित करत आहेत, त्यांच्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. त्याचबरोबर, त्यातील अँटिऑक्सिडंट्स दाह कमी करून आणि पेशींचे एकूण आरोग्य सुधारून दीर्घकालीन फायदे देऊ शकतात,” असे त्यांनी ‘द इंडियन एक्स्प्रेस’ला सांगितले.

**काय लक्षात घ्यावे?**

एक गोष्ट लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, शिजवताना उष्णता आणि आम्लतेमुळे (acidity) या भेंडीचा जांभळा रंग बदलून तो हिरवा किंवा तपकिरी होतो. ‘तिचा मूळ रंग आणि पोषक तत्त्वे टिकवून ठेवण्यासाठी ती अगदी हलकी शिजवणे उत्तम ठरते; जसे की पटकन परतून (saute) किंवा भाजून घेणे, किंवा आमटी-रस्स्यामध्ये स्वयंपाकाच्या अगदी शेवटी घालणे,’ असे गोयल म्हणाल्या.”

तिची उपलब्धता अजूनही मर्यादित असू शकते आणि ती अनेकदा सेंद्रिय दुकाने, शेतकरी बाजार (Farmers’ Market) किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर आढळते.

# पावसाळ्यात डायरिया, पोटदुखीचा त्रास? दुर्लक्ष करणं पडेल महागात, लगेच ‘अशी’ घ्या काळजी

पावसाळा आपल्याबरोबर अनेक आजारही घेऊन येतो. पावसाळा सुरू होताच, पोटदुखी, उलट्या, जुलाब आणि अन्न विषबाधा झालेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढते. अन्न विषबाधेमुळे अनेकदा रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येते. रस्त्याच्या कडेला मिळणारे रस किंवा जास्त काळ साठवून ठेवलेले अन्न खाल्ल्याने ही समस्या अधिकच गंभीर होते.



बहुतेक लोकांना सुरुवातीला पोटदुखीचा त्रास होतो, यावेळी त्यांना कळत नाही की हे केवळ अपचन आहे की अन्नातून विषबाधा होण्याची सुरुवात आहे. काही लोक वारंवार होणाऱ्या उलट्या आणि जुलाबाकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स झपाट्याने कमी होतात. पोटदुखी झाल्यावर, लोक अनेकदा डॉक्टरांचा सल्ला न घेता वेदनाशामक किंवा अँटीबायोटिक्स घेतात, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिघडू शकते.

**अन्नातून विषबाधा झाल्याची सुरुवातीची लक्षणे कशी ओळखायची?**

पावसाळ्यात साल्मोनेला आणि ई. कोलाय सारख्या जीवाणूंची झपाट्याने वाढ होते. दूषित पाणी आणि अन्नामुळे अन्न विषबाधा होऊ शकते. म्हणूनच आरोग्य तज्ज्ञ पावसाळ्यात अन्न स्वच्छता राखणे, स्वच्छ पाणी पिणे आणि ताजे अन्न खाण्याचा सल्ला देतात.

डॉक्टरांच्या मते, अन्नातून विषबाधा झाल्याची सुरुवातीची लक्षणे लवकर ओळखल्यास, बहुतेक रुग्ण काही दिवसांत बरे होतात. मात्र, लक्षणे गंभीर असल्यास किंवा दीर्घकाळ टिकून राहिल्यास, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.पावसाळ्यात वातावरणातील आर्द्रता जास्त असते, ज्यामुळे जिवाणू, विषाणू आणि बुरशी यांच्या जलद वाढीस चालना मिळते. जर अन्न दीर्घकाळ खोलीच्या तापमानात साठवून ठेवले, तर हानिकारक सूक्ष्मजीवांची वाढ होऊ शकते.

रस्त्याच्या कडेला विकले जाणारे खाद्यपदार्थ, दूषित पाणी, उघड्यावर ठेवलेली फळे आणि भाज्या यांमुळे संसर्ग होऊ शकतो. पावसाळ्यात माश्यांची संख्याही जास्त असते, ज्या मातीतून जिवाणू उचलून अन्नापर्यंत पोहोचवतात. यामुळेच या हंगामात अतिसार, उलट्या आणि पोटाच्या संसर्गाचे प्रमाण वाढते.

**सामान्य पोटदुखी आणि अन्नातून विषबाधा यांमधील फरक कसा ओळखावा?**

सामान्य पोटदुखी बहुतेकदा गॅस, अपचन किंवा अति खाण्यामुळे होते आणि ती कालांतराने कमी होते. जर वेदनेबरोबर वारंवार उलट्या, जुलाब, मळमळ, ताप, अशक्तपणा किंवा पोटात पेटके येत असतील, तर ते अन्न विषबाधेचे लक्षण असू शकते.

बऱ्याच प्रकरणांमध्ये, शौचातून रक्त पडणे आणि तीव्र ताप येणे यांसारख्या समस्या देखील असू शकतात.

जर लक्षणे १-२ दिवसांपेक्षा जास्त काळ टिकून राहिली किंवा निर्जलीकरणाची चिन्हे दिसू लागली, तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधावा.

**अन्नातून विषबाधा झाल्यास काय करावे?**

अन्न विषबाधेची लक्षणे दिसल्यास, शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवणे ही पहिली पायरी आहे. ओआरएस द्रावण, स्वच्छ पाणी, नारळाचे पाणी आणि इतर द्रवपदार्थ पिणे सुरू ठेवा.

सुरुवातीला हलके आणि सहज पचणारे अन्न खा.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे किंवा अतिसारावरील औषधे घेऊ नयेत.

# १ महिना रोज मुठभर अक्रोड खाल्ल्यानं काय होईल?

अक्रोडमध्ये आरोग्यदायी फॅट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात; ज्यामुळे शरीराला अनेक फायदे मिळतात. पण, तुम्हाला माहीत आहे का की ३० दिवस अक्रोड खाल्ल्याने काय होते? महिनाभर अक्रोड खाल्ल्याचा हृदय, मेंदू आणि शरीरावर कसा परिणाम होतो आणि शरीराला कोणते विशिष्ट फायदे मिळतात? चला जाणून घेऊयात.

ड्रायफ्रूट्समधील अक्रोडला ब्रेन फूडही म्हणतात. अक्रोड आरोग्यासाठी वरदान मानले जातात. अक्रोड खाल्ल्याने आरोग्याला अनेक फायदे मिळतात. खासकरून मेंदूच्या आरोग्यासाठी अक्रोड खूप फायदेशीर मानले जातात. रोज मूठभर अक्रोड खाल्ले तर शरीरात अनेक सकारात्मक बदल बघायला मिळतात.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदे**



दररोज अक्रोड खाल्ल्याने हृदयाच्या आरोग्याला फायदा होतो. अक्रोडमध्ये दाह आणि ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करणारे गुणधर्म असतात, ज्यामुळे उत्तम आरोग्यास चालना मिळते.

**पचनसंस्था निरोगी ठेवते**

अक्रोडमध्ये पॉलिफेनॉल्स असतात, ज्यांचे पचनमार्गातील सूक्ष्मजीवांद्वारे चयापचय होते; त्यामुळे अक्रोडाचे सेवन पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते.

**स्मरणशक्ती सुधारते**

अक्रोड खाल्ल्याने मिळणारे ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स मेंदूची कार्यक्षमता वाढवतात. स्मरणशक्ती चांगली राखण्यासोबतच अक्रोडाचे सेवन ‘फ्री रॅडिकल्स’मुळे होणाऱ्या नुकसानापासून मेंदूचे रक्षण करण्यासही मदत करते.

**तणाव कमी करते**

अक्रोड खाण्याचा आणखी एक फायदा म्हणजे, त्यामध्ये मज्जासंस्थेला पूरक ठरणारे घटक जसे की मेलाटोनिन, फोलेट, व्हिटॅमिन ई आणि पॉलिफेनॉल्स असतात; जे मानसिक आरोग्यास मदत करतात. यामुळे तणाव कमी होण्यासही मदत होते.

**वजन कमी करण्यास मदत करते**

नाश्ता किंवा स्नॅक म्हणून अक्रोड खाल्ल्याने वजन कमी करण्यास मदत होऊ शकते. तसेच, ते भूक नियंत्रित ठेवण्यासही मदत करतात.

**रक्तदाब कमी करू शकते**

अक्रोड रक्तदाब कमी करण्यासाठीही गुणकारी ठरू शकतात. परिणामी, रक्तदाब कमी होण्यासोबतच हृदयाचे आरोग्यही जपले जाते.